निलेश देसाई

# प्रेमयात्री



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# प्रेमयात्री

(प्रेमकथा)

लेखक : निलेश देसाई

# प्रेमयात्री

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

प्रेमयात्री

लेखक :   निलेश देसाई

पत्ता : २०५/बी, ओंकारेश्वर अपार्टमेंट, वडवली, अपोझिट रायगड बील्ड.

अंबरनाथ (पू). ठाणे – ४२१५०१

मोबाईल नंबर:- 9833471147

संकेतस्थळ : https://www.marathistory.online/

ई-मेल : desai.nilesh199@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २१ जुलै २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

नमस्कार निलेश मित्रा,

आज ई साहित्या वरून तुझी शापित राजपुत्र कथा वाचण्यास मिळाली. कथा वाचून , हे कथानक आपल्या आजूबाजूला कोठेतरी घडतंय असच वाटले.

मस्त..

असेच लिखाण चालू ठेव, तुला भरभरून यश मिळो ही स्वामी चरणी प्रार्थना.

ई साहित्य टीम, शतशः धन्यवाद.

एक वाचक

दीपक ठाकूर

'डॉमिनंट' ही कांदबरी वाचली. आनंद सुद्धा झाला.आणि एखाद्या थ्रील्लर चित्रपटापेक्षाही कील्लर चित्रपट शब्दातुन डोळयासमोर ठेवल्याबद्दल तुमचे खरंच अभिनंदन!

आणि येथील हिंदीतील शब्द रेखांटन अप्रतीम वाटतं

तुमच्या नवीन लेखनास शुभेच्छा! तुमच्या पुढील पुस्तकाच्या प्रतिक्षेत़.......!

आकाश नागपुरे

श्री नीलेश देसाई यांची शापित राजपुत्र ही कादंबरी वाचली. खूप छान आहे. पुढील लिखाणासाठी शुभेच्छा

सुनंदा चक्रदेव

नमस्कार निलेश..!

मित्रा तुझी “डॉमिनंट” कादंबरी वाचली. अतिशय सडेतोड अन उत्तम लिखाण आहे तुझे. प्रत्येक प्रसंग वाचताना डोळयापुढे त्याचं काल्पनिक चित्र आपोआप तयार होतं आणि वाचण्याची मजा अजून वाढते. सुरुवातीला इतर पात्रे डॉमिनंट वाटली पण सरते शेवटी मनू सर्वांवर भारी पडली आणि खऱ्या अर्थाने तीच डॉमिनंट निघाली. ई साहित्यचे आभार अन तुझ्या पुढच्या पुस्तकासाठी खूप खूप शुभेच्छा.

धन्यवाद.

सचिन कुंभार

Hii Sir.

Greetings!

Dominent Book is a awesome book of suspence and thrilling. I have read it. and best of luck for your next turn.

Thank you,

Ashwini.Lomate

नमस्कार ई साहित्य प्रतिष्ठान,

मी आपल्या वेबसाईटवरील, श्री. निलेश देसाई यांचे डॉमीनंट हे पुस्तक वाचले.

खूपच छान असे पुस्तक आहे हे. रोमांचकारी, ऍक्शनने भरपूर असलेले हे पुस्तक गुप्तहेरांच्या गोष्टींमधले एक वेगळे पुस्तक म्हणून शकतो.

मी लेखकांनाही मेल करून प्रतिसाद कळवलेला आहे.

आपण नवीन लेखकांना हा मंच उपलब्ध करून दिल्याने खूप लेखक लिहिण्यास प्रोत्साहित होतील आणि वाचकांनाही खूप साहित्य वाचावयास मिळेल.

धन्यवाद,

प्रथमेश सागवेकर,

पुणे

# मनोगत

ई साहित्य टिमचे पुन्हा एकदा आभार.

'डॉमिनंट' आणि 'शापीत राजपुत्र' या दोन्ही पुस्तकांना दिलेले अभिप्राय, कौतुक याबद्दल सर्व वाचकांना मनापासून खुप धन्यवाद. आपल्या प्रतिसादामुळे लिहीण्यास आणखी बळ मिळाले, आणि त्या जोरावरच नवा हुरूप घेऊन निरनिराळया विषयांवर लिहीण्यास सुरूवात केली. त्यामुळेच एक लेखक म्हणून माझ्या या वाटचालीत वाचकांचा मोलाचा वाटा आहे.



पुन्हा एकदा आपल्या भेटीला 'प्रेमयात्री' या नव्या पुस्तकरूपाने येत आहे. आशा आहे यातील विषय आपल्याला आवडतील.

प्रेमाचे रंग किती आणि कोणते, कोण बरे निश्चित सांगू शकेल. खरंतर याचं ठराविक उत्तर कोणासही ठावूक नसेल. विधात्याने मानव आणि त्याचे मन इतक्या क्लिष्ट रचनांनी निर्मित केले आहे की ज्याचा आढावा सामान्य मनुष्य घेऊ शकत नाही. कोणाचं मन कधी, कुठे, कसं आणि कोणावर येऊन थांबेल सांगता यायचं नाही. पण त्या दोन मनांतील नातं, त्यातला आनंद यांचा आदर करणं आणि ईश्वराच्या त्या सुंदर निर्मितीचा आस्वाद घेणं हे तरी सामान्य माणसाच्या हाती आहे.

प्रेमाने जगही जिंकता येत असेल तर आपण आपल्या आयुष्यात येणाऱ्या व्यक्तीवर थोड्याफार प्रेमाची उधळण तर करूच शकतो.

सामाजिक नियम पाळून एखाद्याच्या आयुष्यात जाण्यासाठी कोणीतरी आपणहुन पुढाकार घेतो, कोणी समोरच्या व्यक्तीला त्रास न देता त्यांच्यासमोर आपल्या भावना व्यक्त करतो, समाजात दुर्लक्षित असलेल्या एखाद्या घटकाचीही तर प्रेमकहाणी असते. कधीकधी शारीरिक व्यंगापलीकडे प्रेम जातं. कधी लहानपणीचं आकर्षण आठवून हसू येतं, तर कधी विरहाच्या दु:खाने डोळयांत पाणी येतं. कधी प्रेम भांडणातूनही फुलत जातं आणि कधी जिथे प्रेम उमलण्याची सुतरामही शक्यता नसते तिथेही जन्म घेतं.

असाच एक कथासंग्रह,

**प्रेमयात्री...**

------- निलेश शिवाजी देसाई

जन्म तारीख : १९-०९-१९८८

पत्ता : २०५/बी, ओंकारेश्वर अपार्टमेंट, वडवली, अपोझिट रायगड बील्ड.

अंबरनाथ (पू). ठाणे – ४२१५०१

मोबाईल नंबर:- 9833471147

संकेतस्थळ : https://www.marathistory.online/

ई-मेल : desai.nilesh199@gmail.com

'डॉमिनंट'


लेखक निलेश देसाई


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dominent_nilesh_desai.pdf

'डॉमिनंट'

लेखक निलेश देसाई

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dominent_nilesh_desai.pdf



**अर्पणपत्रिका**

प्रेमात न्हालेल्या सर्व प्राणीजातीला अर्पित.

डॉली माझी लाडकी मांजर, तिच्या आठवणीत, तिला समर्पित..

अनुक्रम

मैत्री, फेसबूक आणि प्रेम

प्रेमतरंगं...

एक आठवण...

एका बोक्याची प्रेमकथा

माणूसपणाचा आधार

हवेत उडणारी मुलगी

"ती जाते तेव्हा..."

छेडीत जाऊ आज प्रीत..

तो की ती

# मैत्री, फेसबूक आणि प्रेम

"कसला क्युट दिसतो ना गं तो.. तुला सांगते स्नेहा, असं वाटतं.. सगळं सोडून त्याचं होऊन जावं.." निता पीसीवर फेसबुक चालू करून माझ्याशी बोलत होती. त्याचा प्रोफाईल फोटो पाहत.. हल्ली तिचं हे दररोजचंच झालेलं.. कशी ओळख झाली काय माहीत यांची. फेसबुकवरची मैत्री.. किती दिवस टिकेल शंकाच होती. आणि वर निता म्हणजे अगदी कहरच..

"अगं पण तु का नसत्या भानगडी मागे लावून घेतेस.. तुला एक बॉयफ्रेंड जमत नाही का गं.." मीही जरा रागातच बोलले.

"अरे तू नही समझेगी मेरी जान.. कमब्खत दिल भवरें की तरह उडता है मेरा.. आ जाते है पसंद कुछ चेहरे तो क्या करें..!" निताने फिल्मी डायलॉग मारला.

मला तर अक्षरशः राग आलेला तिचा. पण मी काहीच बोलले नाही. थोडावेळ थांबून मी तिथुन निघाले.

निता.. अजबच कॅरेक्टर आहे हिचं.. स्वतःचा एक बॉयफ्रेंड आहे तरीपण फेसबूकवर फेक अकाऊंट सुरू करून नविन नविन मुलांशी फ्रेंडशीप करायची, प्रेमाच्या गप्पा मारायच्या, मग भेटायचं.. आणि त्या मुलांना तरी काय आहे.. त्यांना आयतंच भेटतंय सगळं.. मग मागे का हटतील....

निताच्या विचारचक्रातच मी कधी घरी येऊन पोहोचले मलाच कळले नाही.

निता माझी बालमैत्रिण.. एकदम घट्ट अशी आमची मैत्री. तशी ती आहेच खुप प्रेमळ.. अगदी लहानपणापासून.. पण ऑर्कुट वर एकाशी मैत्री झाली. त्याचं रूपांतर पुढे प्रेमात झालं.. मला अनिल अजिबात आवडायचा नाही. दिसण्यात निता पुढे तो अगदी काहीच नव्हता. बरं वागणं तरी ठिक असावं तर ते पण नाही. सारखा फक्त नितावर शंका घेऊन असायचा.

सुरूवातीला तर ती बिचारी सगळं सहन करायची. नंतर नंतर तो हातही उगारू लागला. तीला खरंतर त्याच्या सोबतचे नाते संपवायचेही होते. तरीही मन अडकलेले तीचे त्या चार वर्षांच्या नात्यात.. पण हल्ली त्याच्या अश्याच वागण्यामुळे निता कंटाळुन आता खरोखरच त्याच्या नकळत इतर मुलांशी बोलायची.

मी सहसा ऑफिसवरून घरी जाताना निताला भेटून जायचे.. असंच फेसबूकवर काल एकाशी ओळख झाली तिची. त्याचाच फोटो दाखवत होती ती मला.. खरं सांगायचं तर हा तिसरा फोटो होता तीने मला दाखवलेला. या अगोदरही तिने दोघांशी ऑनलाईन फ्रेंडशीप ठेवली होतं. फक्त ऑनलाईनच हा.. प्रत्यक्षात मात्र एक दोनदाच भेटली असावी त्यांना तेही मैत्रीपुरतं.

आणि आता हा तिसरा.. पहील्या दोघांच्यावेळी तर मला फारसे काही वाटले नव्हते. पण आज मी निताशी थोडं तुटकंच बोलले.. अजून एक.. नितावर मघाशी मला राग येण्याचं कारणही बहुतेक हाच नविन मुलगा असावा. सुमेध नाव त्याचं. दिसायला एकच नंबर.. अगदी शाळेत असल्यापासूनचं माझं क्रश अमिर खान.. त्याच्यासारखीच चेहरेपट्टी.. गोरापान.. त्याचा फोटो पाहताक्षणीच मला माझ्या आयुष्यातली पोकळीक जाणवू लागली.

अहं.. मी पण कीनई, काहीही विचार करते..

पुढचे दोन दिवस ऑफिसमध्ये काम जास्त असल्यामुळे निताकडे जाणं काही जमलं नाही. पण या दोन दिवसात सुमेधला फेसबूकवर शोधून काढलंच. त्याची प्रोफाईल झाडून पाहीली.. थॅन्क् गॉड.. सिंगल होता तो.. दिवसभर वेळ नाही भेटला पण अख्खी रात्र त्याचे सर्व फोटो पाहण्यात गेली माझी.. बाईऽऽ.. एवढी का मी वेडी झाली त्याच्या पाठी..

मला तसं पूर्वीपासून प्रेमप्रकरणे वगैरे यात कधी इंटरेस्ट असा नव्हताच.. पण सुमेधला पाहील्यापासून खुप बदलत चाललं होतं माझं मन.. मध्येच कुठल्याही क्षणी त्याचा फोटो नजरेसमोरच्या वलयात यायचा. रस्त्याने चालताचालता अचानक त्याची आठवण यायची. अरे.. देवा.. हे काय होत आहे माझ्यासोबत..

अवघ्या दोनच दिवसात मी त्याचा इतका विचार करू लागले होते. ते एक मृगजळ आहे हे समजून सुद्धा.. मी आजपर्यंत प्रत्यक्षात आलेले सर्व प्रस्ताव धुडकावले होते. हा तर फेसबूकवर.. मग काय बोलता.. आणि त्यात निताही त्याच्यावर फिदा.. तरीही मन मानायला तयार नव्हते..तिसर्या दिवशी संध्याकाळी निताच्या घरात पाय ठेवताच ती मला अक्षरशः आत खेचूनच घेऊन गेली.

"अगं सुमेधने माझा फोटो मागवला होता पाहायला.." निता उत्तेजित होऊन सांगत होती.

"मग.." मी काहीसं त्रासिक होऊन विचारले.

"मग काय.. मी पाठवला त्याला.. पण आपल्या दोघांचा फोटो.. म्हणाले त्याला.. ओळख यातली मी कोण आहे ते.." - निता.

"काय...?" आता आश्चर्यचकित व्हायची पाळी आली माझी. "अगं पण का.." मी निताला असं करण्याविषयीचं कारण विचारलं.

"का.. माहीत नाही.. पण मला वाटलं.. गंमत करू.. पण याचा उलटाच परीणाम झाला गं स्नेहा.." निता काकूळतेने म्हणाली.

"काय झालं असं.." - मी ऊत्सुकतेने विचारले.

"त्याने प्रपोज केला.." - निता.

"व्हाट....!" निताचं म्हणणं ऐकून मला खरंच रडायला यायचं बाकी राहीलेलं, इतकं बेकार फिल होऊ लागले.

तरीही निताच्या चेहऱ्यावर समाधान दिसत नव्हतं.

"हा ना यार... प्रपोज केला.. पण तु समजून... त्याला तुझा फोटो आवडला.. मीही म्हटलं अजून थोडी गंमत करू म्हणून.. म्हणून हो हो करत गेले.. आणि त्याने टाकला बॉम्ब मग.. मला तू आवडतेस अन् काय ना काय.." निता नाराजीतच बोलत होती.

एव्हाना मलाही थोडे हायसे वाटायला लागले होते. पण तरीही आता पुढे काय होणार याची काळजी होती. मी निताला अजून माझ्या मनातले काही सांगितले नव्हते. खरं सांगायचं तर माझी मलाच खात्री नव्हती.

"पुढे काय करणार आहेस आता.." मी निताच्या मनातलं काढून घेण्याचा प्रयत्न केला.

"माझी बुद्धी भ्रष्ट झालेली.. मी माझाच फोटो द्यायला हवा होता फक्त.. तु तसंही त्याच्यात इंटरेस्ट घेणार नाहीस.. मला माहीत आहे... बघु काय करायचे विचार करते मी.." निता थोडीशी चिंतेतच होती.

"अगं पुढे काय म्हणजे.. जरी सुमेधला तु सगळं खरं सांगितलंस... आणि तो तयारही झाला.. तरी तुझा आताचा बॉयफ्रेंड अनिलचं काय.. त्याला काय सांगशील?" - मी निताला परीस्थितीची जाणीव करून देत विचारले.

"अम्म्... माहीत नाही.. आय मीन्.. अनिलला यातलं काही सांगायचा विचार नाही माझा.. सुमेधला भेटून फोटोबद्दल प्रत्यक्ष सांगेन सर्व.. दॅट्स ईट.." - निता काहीच झाले नसल्याच्या आविर्भावात बोलत होती.

मला मात्र ते खटकत होते. निताकडून निघाल्यावर मी माझा निर्णय केला. रात्री जेवण करून झाल्यावर मी मोबाईल घेतला. निताच्या फेक अकाऊंटचा आयडी पासवर्ड माहीत असल्याने तिचं अकाऊंट चालू करायला फारसे कष्ट पडले नाहीत.

सगळयात अगोदर सुमेधबरोबरची तिची चॅटींग पाहीली. अगदी सुरूवातीपासूनची.. सगळा प्रकार लक्षात आला.. निता मॅसेजसमध्ये सुमेधशी जरा जास्तच फ्लर्टींग करायची.. तो मात्र बुजरा वाटत होता.. तिच्या मॅसेजेसना त्याच्या स्माईलीचं उत्तर असायचे फक्त.. शेवटचा मॅसेज पाहीला.. अपेक्षेप्रमाणे नितानेच त्याला केलेला.. फोन नंबर मागण्यासाठी.. सुमेधचा त्यावर काही रीप्लाय आला नव्हता अजून.. बहुतेक कामात असावा.. तो सेकंड शिफ्ट मध्ये असायचा हे मॅसेजेसमधून कळलं होतं मला..

झोप तर खुप आलेली पण आज या विषयावर कुरापत करायचीच असे ठरवले होते मी. आणि मी तसंच अगदी करायला घेतलं. सर्वप्रथम निताच्या फेक अकाऊंटचा पासवर्ड चेंज केला. आणि शांत झोपायला घेतले. रात्री साधारण बारा वाजता सुमेधचा मॅसेज आला. त्यानं नंबर दिला त्याचा...

निताने चुकून केलेल्या त्या गंमतीकडे सुमेधने सत्य मानून कुच केलं होतं.. पण ते पूर्णसत्य नव्हतं.. बस्स.. मला त्याच गंमतीचा आणि सत्याचा मेळ घडवून आणायचा होता.

"हाय.. निघालास का घरी.." - मी.

"हो.. आताच.. तुला राग तर नाही ना आला.. मी तुझा फोटो पाहून थोडं घाईतच विचारले त्याबद्दल.." सुमेध.

सुमेध आणि निताची चॅटींग आता मीच पूर्ण करत होते. माहीत नव्हतं.. याचा अंत कुठे असेल ते.. पण थोडं का होईना.. मन स्वार्थी बनू पाहत होतं.

"नाही रे राग नाही आला.. पण इतक्या अचानक तू विचारलेस.. अजून आपण एकमेकांना भेटलोही नाही.. आपल्या आवडीनिवडी वगैरे काहीच माहीत नाही.. मग कसं ना.. काही बोलणार मी..!" मीही मनात जे आलं सांगितले.

"हो.. तुझंही बरोबर आहे.. पण मी समोर आलो असतो तर हे सर्व नसतो बोलू शकलो.. कधी जमलंच नसतं.. प्रपोज करणं.." सुमेध.

"मला वाटतं आपल्याला त्याअगोदर भेटून एकमेकांना वेळ द्यावा लागेल.. नाही का..?" मी बिनधास्त बोलून मोकळे झाले.

"अर्थातच.. माझ्या मनातलं बोललीस तू.." सुमेध.

"ह्न्.. मग.. पण एक अट आहे माझी.." मी अजूनही सावध राहत म्हणाले.

"बोला.. काय अट आहे.. जमले तर मान्य करेनच.." सुमेध.

"आपल्या मैत्रीदरम्यान तुला फेसबूक बंद ठेवावे लागेल.. आपले हो की नाही एकदा नक्की झाले तर तु पुन्हा तुझं अकाऊंट वापरू शकतोस.. पण तोपर्यंत आपल्यात बाकी कोणी नको.. आणि त्यासाठी तुझा फेसबूक अकाऊंट तुला माझ्या हवाली करावा लागेल.." मी त्याच्या उत्तराचा अंदाज घेतच त्याला कसेबसे विचारले.

यातून दोन गोष्टी निश्चित होणार होत्या.. एक तर मी त्या अकाऊंटशी काही वेडंवाकडं करणार नाही असा त्याचा माझ्यावरचा विश्वास.. आणि दुसरं म्हणजे स्वतःच फेसबूक अकाऊंट माझ्याकडे दिलं असतं तर माझा त्याच्यावरचा विश्वासही वाढला असता.

सहसा असं झालं नसतं.. पण आम्ही दोघेही त्या रात्री एकमेकांमध्ये इतकं गुंग होऊन गेलेलो की एकमेकांसाठी काहीही करू शकलो असतो..

सुमेधने जराही आढेवेढे न घेता मला आयडी पासवर्ड दिला. आणि माझा त्याच्यावरचा विश्वास द्विगुणीत झाला.

रात्री दोन वाजेपर्यंत त्याच्याशी चॅटींग चालूच होती माझी. जितके होईल तितके त्याच्याबद्दल माहीती काढली. त्याच्या सांगण्यात सुसूत्रता होती. सुमेधशी चॅटींगवर बोलताना खुप आपलेपणा जाणवू लागला. त्याच्या मॅसेजमधून हे कळत होतं की त्याला मुलींशी बोलण्याचा अगदीच अनुभव नाही. एकूण त्याचं व्यक्तीमत्व मला जेन्युअन वाटलं.

या रात्रीने खरंच मन सुखावून गेले होते. एका अनोळखी व्यक्तीशी मी इतकावेळ चॅटींग करत होते. झोप कुठल्याकुठे पळून गेली होती. उलट फ्रेश वाटत होतं.. मनातली आजपर्यंतची सगळी मरगळ निघून गेल्यासारखं..

रात्री झोप कधी लागली कळलेच नाही मला..

सकाळी सहाला जाग आली.. तेव्हा पाहीले.. सुमेधचे तीन चार मॅसेज होते.. ऑफिससाठी आवरायला दोन तास होते माझ्याकडे.. पण महत्त्वाचं काम अजून करायचं होतं मला.

सुमेधच्या अकाऊंटचा पासवर्ड बदलला. नंतर त्याच्या अकाऊंटमधली प्रायव्हसी सेटींग पण बदलली. त्याच्या अकाऊंटमधून निताच्या फेक अकाऊंटला ब्लॉक केलं. आणि शेवटचं आणि सर्वात महत्वाचं म्हणजे निताच्या अकाऊंटमधून कालची सर्व चॅटींग डिलीट करून टाकली. यासगळ्यामागे प्लानिंग हीच होती की निता आणि सुमेध मध्ये काही कॉन्टॅक्ट राहू नये.

सगळं आटोपून थोडावेळ शांत बसले. कालची रात्र आणि आजचा कारणामा.. हे सर्व करताना खुपच थ्रिल वाटत होतं.

या दिवसानंतर साधारण एक महीना आम्ही भेटत राहीलो. सुमेध राहायला दुसर्या जिल्ह्यांत होता. त्यामुळे आमचं भेटणं तसं आठवड्यातून एकदा दोनदाच व्हायचं. फोनवर बोलणं मात्र अगदी रोज व्हायचं. पहील्याच भेटीत त्याच्यातला साधेपणा मला भावला होता. महीन्याभरानंतर त्याच्या आईवडीलांना भेटवण्यासाठी घरीही घेऊन गेला तो मला.. म्हणजे मैत्रीण म्हणूनच..

त्यादिवशी मला सोडायला येताना त्याने विचारलं, "लग्न करशील माझ्याशी..?

नाही म्हणण्यासारखे माझ्याकडे काहीच कारण नव्हते. आणि याच एका क्षणासाठी मी नाही नाही ते पराक्रम केले होते. तरीही मनात निताबद्दल वाईट वाटत होतं. मी सुमेधला एक महिन्यापूर्वीचा सगळा प्रकार जसाच्या तसा सांगितला.

"आता खरंतर तुच उत्तर दे.. मी जे केलं ते योग्य की अयोग्य..?" - मी.

माझं म्हणणं ऐकून सुमेध हसत सुटला... खुप वेळ हसला.

"अगं वेडाबाई.. बरे झाले ना.. तु हे सगळे केलेस नाहीतर एव्हाना निताशी माझा ब्रेकअप पण झाला असता.. आणि मी मजनू बनून भटकत फिरलो असतो.." सुमेधचं हसणं अजून थांबले नव्हते.

मी त्याला हलकी चापट मारत म्हटले.. "तसं नाही रे.. पण ती माझी मैत्रीण आहे.. म्हणून वाईट वाटतेय.."

"अगं मुळात मला तुझा फोटो आवडला होता.. आणि तुझा फोटो पाहून मी प्रपोज केलेला.. आणि आज तुच माझ्या सोबत आहेस.. मग यात चुकीचं काय आहे.. आणि जे काही तु केल आहेस त्यातून चांगलंच निष्पन्न झालेय.. तु बाकी ग्रेटच आहेस.." सुमेध मला समजावत म्हणाला.

त्याचा हा पॉईंट मला पटला.

"स्नेहा, तु मला मिळवण्यासाठी इतकी धडपड केली आहेस, ते जाणल्यावर तर मी आणखीनच तुझ्या प्रेमात पडलो आहे.. आणि आता तर मी ठरवलेच आहे.. लग्न करेन तर तुझ्याशीच.. अर्थात तू हो म्हणशील तरच.." सुमेधने पुन्हा लग्नाचा प्रस्ताव माझ्यासमोर ठेवला.

"अरे हो.. तुझ्याशी लग्न करण्यासाठीच तर एवढी धडपड केली मी.." माझ्या आनंदाला पारावार उरला नव्हता.

निताशी इतक्या दिवसांत मी भेटणं टाळलंच होतं. आणि तीने नकळत केलेल्या चुकीमुळे मला माझ्या आयुष्याचा जोडीदार मिळाला होता.

निताला स्वतःहुन सांगायचे नाही असेच आम्ही ठरवले होते. जेव्हा कळेल तेव्हा कळेल. तिला कळाल्यावर तिची प्रतिक्रिया काय असेल, हे माझे मलाच माहीत नव्हते.. पण मलातरी असे वाटतेय, मी जे केले ते योग्यच होते..

"शेवटी युद्धात आणि प्रेमात सगळं काही माफ असतं.."

# प्रेमतरंगं...

"कधी तुझ्या जवळून जाताना, तुझ्रा श्वासाच्या होणार्या स्पर्शानेही.. मन विचलीत होऊन जातं. खुप बोलावसं तुझ्याशी... तेव्हा कुठे, मन तृप्त होईल असं वाटतं.. तुझं वागणं, बोलणं.. तुझ्या असंख्य नजाकती.. अनुभवाश्या वाटतात... कसंकाय जमतं गं तुला.. इतकी सारी हत्यारं घेऊन घराबाहेर पडायला.."

"म्हणजे बाकी कुण्या तरूणीकडंही असतील एखाद दुसर्या अदा.. पण तू.. तु तर अगदी नजरेनंच घायाळ करतेस..

कोरलेल्या तुझ्या भुवयांनी प्रतिप्रश्न करताना..

भिरभिरणार्या पापण्यांनी सगळं वातावरण स्तब्ध करताना..

लयबद्ध चालीनं सर्वांना आकर्षून घेताना..

ओठांचा चंबू करून सेल्फी काढताना..

अंगभर पसरलेल्या ओढणीत अलगद हात

झाकताना..

पाहीलेय मी तुला..

असं निशब्द मला करताना..."

"मी तर वाहावत गेलेलो तुझ्या प्रेमाच्या प्रवाहात.. अगदी कॉलेजच्या पहील्या दिवशी तुला पाहीलं तेव्हापासून.. तुझं मात्र लक्ष नाही गेलं कधी.. माझ्याकडे.. कसं जाणारं बुवा.. मी बुजरा.. कोणाच्याही खिजगिणतीत नसलेला.. कधी कुणाशी बोलणं नाही.. की ओळख नाही.. कॉलेजमध्ये कोणत्याही ग्रुपमध्ये समावेश नसलेला.. अलिप्त.. सर्व जगाशी.."

"तु दिसायचीस जेव्हा जेव्हा.. माझे भाबडे मन प्रयत्न करायचे.. तुझ्याशी नजरेनं बोलायचा.. पण तुझी नजर नाही पडायची तेव्हा माझ्यावर.. मन मारून जेव्हा मी तिथून निघून जायचो.. तेव्हा चालताना शंभरवेळा तरी मागे वळून पाहायचो.. तू मला लपून पाहत तर नाहीस ना.. हेच बघायला.."

"आज या केवळ पंधरा मिनिटात मला माझं पूर्ण एक वर्ष धावल्यासारखं डोळयासमोर येत आहे. या संबंध वर्षातला प्रत्येक दिवस तुझ्या विचारांत हरवलेलो मी.."

"जमलंच नाही या संपूर्ण वर्षात.. तुझ्यावरून फोकस हटवणं.. म्हणून कुणाला जवळ केलंच नाही.. पण कदाचित आज मी स्वतःहुन स्टेजवर येण्याची हिम्मत केली म्हणून का होईना.. उद्या ओळख होईल खुप जणांशी.. तु येशील का बोलायला.. खात्री नाही मला.. आणि खरंतर तुझ्याशी डायरेक्ट येऊन बोलण्यापेक्षा.. मला इथे स्टेजवर बोलणं जास्त सोपं वाटतेय.."

"असो.. जर तुला कळलेच कधी की माझ्या मनातली तरंग तुझ्याविषयी आहेत.. तर नक्की भेटायला ये मला.."

कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या वेळी वर्षभर अबोल राहीलेल्या स्वप्नीलने 'मुक्त विचार' च्या नावाखाली मनातले सगळे विचार मुक्तपणे स्टेजवर जाऊन मांडले. त्याच्या म्हणण्यानुसार खरेच पुष्कळ जणांना कॉलेजमधल्या त्याच्या अस्तित्वाची जाणीव नव्हतीच. ना दिसण्यात ना वागण्यात काही असं खास.. जेणेकरून तो कुणाच्या लक्षात राहील. पण स्नेहसंमेलनात स्वतःहुन नाव देऊन त्यानं वर्षाच्या अखेरला का होईना पण त्याचं 'असणं' सर्वांना दाखवलं होतं.

त्याचं बोलणं थांबल्यावर टाळयांचा एकच कडकडाट झाला. शिट्या वाजू लागल्या. आपल्या भावनांना अनपेक्षितपणे मिळालेल्या या प्रतिसादाने स्वप्नील अगदी भारावून गेला. आणि त्याचं बोलणं ऐकताना भावूक झालेल्या प्रीतीच्या डोळयांत पाणी भरून यायला सुरूवात झाली होती.

तिने त्याला पाहीलेलं खुपदा तिला न्याहाळताना.. तिही पाहायची त्याला त्याच्याही नकळत. तिला स्टाईलबाज किंवा बोलबच्चन मुलांचा तिटकाराच होता. आणि कॉलेजातल्या अमोल पालेकरांच्या या कॉपीबद्दल तिलाही आपलेपण वाटू लागलं होतं. पण तो येईल का कधी विचारायला या प्रश्नाचे उत्तर तिच्याकडेही नव्हते.

अहं.. आज स्वप्नीलने तिचं नावही घेतलं नव्हतं किंवा कधी तिला जाणवूही दिलं नव्हतं. तरीही प्रीती समजलीच की तो तिच्याविषयीच बोलत होता..

कोणत्याही ललनेला ते कळतंच की, आपल्याला कोण पाहत आहे वा कुणाची नजर कशी आहे.. ही तरूणींना उपजतच मिळालेली दैवी शक्ती असते म्हणा ना.. पुरूषांना वाटतं.. मी सफाईने तिला न कळता पाहतो.. पण तिला ते कळतंच..

स्वप्नील स्टेजवरून खाली आला. आणि त्याला जिकडे तिकडे त्याच्या नावाची कुजबुज ऐकायला मिळाली. जो तो त्याच्या धाडसाची प्रशंसा करत होता. साहजिकच इतक्या लोकांसमोर.. ते ही कॉलेजच्या स्नेहसंमेलनामध्ये.. असे काही बोलणे म्हणजे खरेच जिगरवाल्याचेच काम होते.

स्वप्नीलची नजर भिरभिरत तिच्यापर्यंत पोहोचली.. थोड्या अंतरावर मैत्रीणींच्या घोळक्यात ती दिसली. तीचीही नजर त्याच्यावरच होती. तिचे पाणावलेले डोळे पाहून त्याच्या काळजाचा ठोका चुकला.. एव्हाना दुसर्या एकाचा परफॉरमन्स सुरू झालेला..

प्रीती अजूनही स्वप्नीलच्या नजरेत रोखून पाहत होती. तो ही अवाक्.. होऊन पाहत होता तिला.. आजपर्यंत एकमेकांशी कधीच न मिळालेल्या नजरा आज फक्त एकमेकांमध्ये खिळल्या होत्या.

त्या दोघांमध्ये दहा फुटाचं तरी अंतर असेल. स्वप्नीलने अश्याप्रकारे प्रेम व्यक्त करून अलगदपणे प्रीतीच्या मनातल्या तारा छेडल्या होत्या. तिलाही त्याचा आतापर्यंतचा साधेभोळेपणा आवडलेला. आणि आपल्या आयुष्यातील अत्यंत प्रिय गोष्ट.. हातातून निसटून जाऊ नये, म्हणून त्याने केलेला आजचा प्रयत्न तर तीला अजुनच सुखावून नेणारा होता. आपल्यावरंच इतकं प्रेम पाहून ती मनातून जाम खुश झाली होती.

प्रीतीनं नजरेनेच स्वप्नीलला बाहेर यायला खुणावले. त्यानंही मान डोलावून होकार दिला. त्याच्यासाठी बाहेर येणं फारसं अवघड नव्हते. फक्त कोणी पाहायला नको.. एवढंच काय ते सांभाळायचे होते.

तीही कशीबशी मैत्रीणींच्या वेढ्यातून सुटका करून बाहेर आली.

कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम ऊत्साहात साजरा होत होता. सगळे आतच कार्यक्रम पाहण्यात मग्न होते.

तिथून बाजूलाच लागून असलेलं कॉलेजचं ग्राउंड.. अन् ग्राउंडच्या कट्ट्याला खेटून असलेले वर्ग.. रात्रीचे साडे आठ वाजले असल्यामुळे बाहेर पसरलेलं अंधाराचं जाळं. आजूबाजूला रहदारी नसल्याने कानांना ऐकू येणारी शांतता.. एका वर्गाच्या पायऱ्यांवर बसलेल्या दोन आकृत्या.. तिथुन दिसणारं आकाशातलं टपोरं चांदणं..

"तु मला इथे बोलावलेस.. याचा अर्थ.." - स्वप्नील (थोडं थोडं क्लिक होत गेलेलं तसं त्याला).

भावूक झालेल्या प्रीतीच्या ओठांवर उत्तर असूनही बाहेर पडत नव्हते..

तरीही पुढच्याच क्षणी प्रीतीने तिच्या ओठांचाच आधार घेऊन उत्तर दिले..

त्यांच्या नजरा अजूनही एकमेकांतच खिळल्या होत्या. फक्त अंतर मघापेक्षा कमी झाले होते.. पाहायला आसपास कुणीच नव्हते.. वर पसरलेल्या अंधाऱ्या चादरीतले चंद्र चांदणेच काय ते साक्षीदार होते...

नदीच्या दोन किनार्याप्रमाणे असलेल्या त्या दोघांच्या नजरा.. त्यांनी थोडेसे प्रयत्न केले, तेव्हा मिळाल्याच.. यात व्यक्त होणं हे महत्वाचं.

आयुष्यात व्यक्त न होणार्या भावनांना कधीच हवे ते मोल मिळत नाहीत. म्हणूनच जेव्हा, जसे जमेल तेव्हा मनातल्या भावनांना त्यांची वाट करून देणं केव्हाही चांगलंच.. अगदी ते प्रेम आईवडील, भाऊबहीण, नवरा-बायको, प्रियकर-प्रेयसी, शिक्षक, मित्र, समाज कुणीही असो.. आपलं त्यांच्यावरचं प्रेम व्यक्त व्हायला हवं..

# एक आठवण...

लिहायलो बसलो खरा आज पण मनात इतके काही विषय आहेत की नेमकं कोणत्या विषयावर लिहू अन् सुरूवात कुठून करू सुचत नव्हतं. पीसीवर लावलेल्या माझ्या फेवरेट कलेक्शन मधलं एक गाण संपले आणि सुरू झाले.... "पीया बसंती रे, काहे सताये आजा..."

"जाने क्या जादू किया.. "

खरंच की एकदम ती आठवली, जादू झाल्यासारखी अचानक इतक्या वर्षांनी... अगदी जसे च्या तसे सर्व नजरेसमोर आले अन् थोड्या वेळासाठी भूतकाळात त्याच बसस्टॉपवर जाऊन बसलो जिथून मी काहीच न बोलता निघून गेलो होतो...

जूलै २००६ मध्ये बीईएसटी मध्ये मी ॲप्रेंटीस म्हणून एक वर्षासाठी रूजू झालो. प्रत्येकी चार महीने वेगवेगळया तीन डेपोंमध्ये काम करण्याचा अनुभव घ्यायचा होता. १२०० रूपये विद्यावेतन भेटणार होते आणि महत्वाचं म्हणजे एक वर्ष बसप्रवास मोफत. मी बराच खूश होतो. अख्खी मुंबई फुकटात कमीतकमी दहा वेळा पालथी घातली. त्याच दरम्यान मला पाचव्या महीन्यापासून सायन जवळचा प्रतिक्षानगर डेपो भेटला. सकाळी साडेसात ते दूपारी साडेतीनची ड्यूटी. मस्त उरलेला अर्धा दिवस भेटायचा ईतर कामासाठी.

प्रतिक्षानगरला जाण्यासाठी मला विक्रोळी वरून पहीले घाटकोपर डेपोला जावे लागायचे. तिथून मग स्टाफबस असायची. सुरूवातीचे दोन दिवस नवलाईत गेले. अन् मग इकडेतिकडे नजर बाकी गोष्टी न्याहाळत जायला लागलो. शेवटची सीट अन् खिडकी ही माझी अत्यंत आवडती जागा. ते यासाठी कारण एकतर तिथून सगळीकडे नजर ठेवता येते अन् दूसरे म्हणजे आपल्यावर कोणाची नजर पडत नाही म्हणून.

असंच चारपाच दिवस गेले अन् एक दिवशी घाटकोपर डेपो सोडल्यावर बाहेरच्या पहील्याच स्टा ॅपवर पाहीले. 'ओह् माय गुडनेस्...' नकळत ओठांतून शब्द बाहेर पडले. काय सुंदर दिसत होती ती... बसस्टॉपवर आतमध्ये ती बसलेली. तिचा चेहरा एकदाच पाहून लक्षात राहण्यासारखा होता. गोरीपान, नाजूक शरीरयष्टी आकाशी रंगाचा ड्रेस तोही फूल स्लीव्ह् चा

अहाहा.. तिच्या सौंदर्यात अजूनच भर घालत होता. मी तिला पाहतच राहीलो अन् बस पूढे निघाली. मी अगदी बस वळण घेईपर्यंत पाहत होतो. पण तिचे काय माझ्याकडे लक्ष गेले नाही.

एक दिवस तिला प्रपोज करायचाच मग काय होईल ते होईल असा ठाम निश्चय मनाशी केला. दूसर्या दिवशी पून्हा तेच.. ती दूसरीकडेच पाहतेय आणि मी तिच्याकडे पाहतोय काही कळायच्या आत बस निघाली. तिसरा दिवस.. बस तिच्या स्टॉपवर आली ती तशीच कुठेतरी भलतीकडे हरवलेली. मी बसमधल्या सर्व स्टाफ कडे अगोदर पासूनच नजर ठेवून होतो. सगळे आपापल्या गप्पांत व्यस्त होते, त्याचा फायदा उचलत मी ऊगीचच काहीतरी ओरडलो अन् त्याचा फायदाही झाला. तिची नजर माझ्यावर पडलीच. मीही एक छानशी स्माईल दिली पण तिने रागाने माझ्याकडे बघत नजर फिरवली.. "अरर् हे काय, सुरूवात अशी व्हायला नको हवी होती". मी मनाशीच म्हटलं.

आता काही होवो तिच्याकडे रोज असेच पाहायचे तसेही मी बसमध्ये आणि ती स्टॉपवर म्हणजे काही ऊलट व्हायची भीती नव्हती. आणि स्टाफबस असल्यामुळे ती काय आपल्याला मारायला आतही येऊ शकणार नाही याची खात्री होती. असो हे आता रोज होऊ लागले तीला पाहून मी स्माईल द्यायचो अन् ती रागाने माझ्याकडे डोळे वटारून पाहायची. असेच मोजू सतरा दिवस गेले, आणि तो दिवस आला. माझ्या स्माईलला तिनेही हसून रीप्लाय दिला. काय सांगू काय आनंद झाला मला तेव्हा. ठरवलं मग उद्या कामाला दांडी.. मस्त तिला प्रपोज करून लगेच कुठेतरी फिरायला जायचं.

दूसर्या दिवशी सकाळी लौकरच ती येण्याच्या आधी तिच्या स्टॉपवर जाऊन बसलो. दिवसभराचं प्लानिंग माझ्या डोक्यात चाललेलं. आज पहिल्यांदाच तिला जवळून पाहणार होतो. तीने मला नीट पाहीले असेल का? खिडकीत माझा फक्त चेहराच दिसत असेल असा अंदाज लावत माझी नजर वळली. आकाशी रंगाचा तोच ड्रेस जो पहील्या दिवशी तीने घातलेला तोच ड्रेस घालून ती समोरून आली अन् माझ्यापासून थोडं अंतर ठेवून माझ्या डावीकडे बसली. मी दुसरीकडे पाहीले दोन शाळेची मूले होती. पून्हा तिच्याकडे पाहीले तिचे लक्ष नव्हते माझ्याकडे. माझी स्टाफबस आली अन् तिची नजर त्याला शोधू लागली पण तो आज नव्हताच तिथे.. तीने चेहरा पाडून मान खाली घातली.

मीही चेहरा पाडून तिथून निघालो. चालता चालता विचार करू लागलो की मान्य आहे ती नेहमी बसलेलीच दिसली मला पण तिच्या बसण्यावरूनही साधा आपण तिच्या ऊंचीचा अंदाज लाऊ शकलो नाही. अहो चक्क चारपाच इंच तरी मोठी असेल ती आमच्यापेक्षा. दिसायला

आम्ही मस्त चिकनं पोर, पण हाईट आमची फाईव्ह पॉईंट फोर... कदाचित चालूनही जाईल मनात विचार आला पण नाही जमलं पुढं जाऊन बोलणं.

त्याचदिवशी कामाला जाऊन उरलेले तीन महीने कायमची सेकंड शिफ्ट करून घेतली.

पून्हा कधीच तिला पाहता आले नाही.. "पीया बसंती रे.. काहे.. सताये.. आ..जा....." गाणे संपले अन् डोळे नकळत पाणावले.

# एका बोक्याची प्रेमकथा

प्रेम तसं तुमचं आमचं सेमचं असतं.. किंबहुना आम्ही तुमच्यापेक्षा दोन पावलं पुढंच असतो.. का म्हणून विचारू नका.. मुळात आम्हाला दोन पाय जास्त असतात..

बसंती वाऱ्यातल्या झुळक्याप्रमाणं तिची झुपकेदार शेपटी माझ्या तोंडावर मऊ चाबकासारखी पडली. आस्स्... डोळं उघडंस्तोर जीभेवर आलेली शिवी.. डोळं खुललं आणि ती शिवी घश्यातंच अडकली..

अहाहा... काय रूपडं तिचं.. जसं रंगपंचमीत तिच्यावरंच कुणीतरी परमनंट रंग टाकलेला... आयशपथ सेम तसंच रंगांचं पांघरुण तिच्यावर.. नारंगी, तपकीरी, पांढरा आन् मध्येचं कुठंकुठं काळा.. किलकिल करत इकडं तिकडं बघणारं तिचं हिरवेगार डोळं.. गुबगुबीत आणि डौलदार शरीर.. आणि तिचा तोरा.. चार पायाची तिची चाल जर कोणी टक लावून पाहीली.. तर खरं सांगतो पाहणार्याचा तोल गेल्याशिवाय राहणार नाही.

आज ती माझ्याशी जरा जास्तच लाडात आली होती. म्हणूनच तिचं शेपटीनं मला डिवचनं चालूच होतं. माझ्याशिवाय चाळीत नव्हतंच कुणी तिच्या लायकीचं. सध्या ति माझ्या प्रेमात होती..

पण पहीलं असं नव्हतं..

'डॉली' नाव तिचं. मला पहिल्यापासूनचं माहीत होतं नाव. अहो पहीलं क्रश माझं ती लहानपणापासूनचं. तिच्या घराजवळच्या वार्या करायला मी किती मारामाऱ्या केल्या मलाच माहीत. आमची बिरादरी तर कशीपण मी ताणून लावायचो.. पण डॉलीचा मालक वीस बावीस वर्षाचा.. लयं खवचंट.. त्याला नुसता मी डॉलीजवळ जाताना दिसलो तर वस्सकन् अंगावर धावून यायचा माझ्या.

डॉली मस्त घरात राहायची, चांगलं चुपलं खायची. आणि मी चाळीवर ओवाळून टाकलेला गुंड होतो. लावारीस.. ना आगे.. ना पिच्छु.. काळाकुट्ट.. मध्येच तपकीरी ठिपके.. रोज रात्री चाळीतली माणसं झोपली की माझी बाकीच्या बोक्यांबरोबर 'कुंग फू' चालू व्हायची.. म्हणुनच माझं शरीर चांगलंच कसलेलं होतं. माझ्या वार्यालापण मी कुणाला उभा राहू द्यायचा नाही.

अन् एखाद्याला लोळवल्यावर मी विजयी फुत्कार मारायला लागलो की डॉलीचा मालक घरातनं बाहेर यायचा. मला नेहमी वाटायचं हा आता जवळ येऊन माझं कौतुक करेल.. आणि डॉलीची अन् माझी सेटींग लावेल.. तो जवळ यायचा सुद्धा.. पण त्याच्या हातातला सोटा बघून मी धुम ठोकायचो. मला कळायचं नाही तो माझ्या विजयावर इतका का चिडायचा..?

एकाच चाळीत असल्यामुळे डॉली पण तसं बर्याचदा बघायची मला. पण मी काय ना काय येडेचाळे करतानाच तिला नेमका दिसायचो.

डॉलीला पटवणं खाऊचं काम नव्हतं. पण मी चंग बांधला होता कायपण करून तिला आपलं करायचंच. त्यासाठी तिच्यावर माझा रूबाब पडणं गरजेचं होतं. म्हणून मी गटारात उतरणं सगळयात पहीलं बंद केलं. मग त्या गटारात उंदरांची फलटण जरी जमा झाली तरी मी साधु बनून राहायला लागलो. मन करायचं खुप पण नाही जायचो. आपल्या अंगाला गटाराचा घाण वास आला तर डॉली भाव देणार नाही हे ठावूक होत मला.

एकदा रात्री बाजूच्या चाळीतल्या बोक्याला पळवल्यावर मी जल्लोष करत होतो. तेव्हा एक म्हातारडं बोकं मला लांबूनच म्हणालं.. "तुझा आवाज असा का आहे..?"

मी म्हणालो.. "कसा...?"

त्याचवेळी म्हातारं जरा बिचकून मागं सरलं.. 'धाड्..ऽड.ऽकन..' सोटा माझ्या पेकाटात पडला.. "वव्या..य..वव.." मी कळवळलो.. आणि पळायला लागलो. डॉलीच्या मालकानंच मारलेला. म्हातारं बोकं माझ्यापुढंच वरडलं.. "आता बोंबललास ना तसाच.."

मी पळता पळता बिचकलोच.. ह्या.. माझा आवाज.. "वऽव्याऽऽव.." मलाच विचित्र वाटला. मग मला कळलं की डॉलीचा मालक माझ्यावर इतका का पिसळायचा..

त्या दिवसापासनं मला बाकीच्या मांजरांची 'म्याव् म्याव्' जहरी वाटायला लागली. डॉलीच्या प्रेमासाठी मी आपला स्पीकर सुधारायचा ठरवलं. चाळीतल्या सभ्य वाटणार्या मास्तराचा पाठलाग केला. त्याचं बोलणं, चालणं, वागणं टिपून घेतलं.. आन् डिट्टो कॉपी करायला लागलो. सर्व बिरादरीशी अदबीनं बोलायला लागलो.. सगळी मांजरं चाट... जो तो ह्याला अचानक काय झाले म्हणून विचारू लागला.

बाकीच्यांचं जाऊ दे.. डॉली मला येता जाता बघायला लागली. माझा 'व् व्याव्यऽ' मी कंठाला जास्त जोर न देता हलकेच काढायचो. त्या ऐक्स्ट्रा 'व्य..' मुळेच माझ्यातल्या प्रेमाच्या आर्त भावनेतला स्पेशल इफेक्ट साधून जायचा. कुठल्याही हीरोइनला आपल्या हीरोमध्ये

काहीतरी बाकीच्यांहुन वेगळंपण पाहीजे असतं. आणि माझ्या नम्र उच्चारणांमुळे माझा पूर्वीचा कर्णकर्कशः आवाज आता मधाळ बनला होता.. नव्हे मी बनवला होता.

चाळीतल्या सगळयांसमोर मी माझ्यातल्या सभ्यतेची उधळण करत होतो. डॉलीचा मालक आता माझ्यामागं लागायचा हळूहळू बंद झाला होता.

आणि तो सोन्याचा दिवस उजाडलाच.. त्या दिवशी बाजूच्या चाळीतला दुश्मन बोका डॉलीवर जबरदस्ती करू पाहत होता. मी कायमच डॉलीच्या मागावर असलेला.. मला ते जसं दिसलं तसा मी हिरोच्या स्टाईलमध्येच त्यांच्या जवळ जायला लागलो.. पलीकडं लक्ष गेलं तर डॉलीच्या मालकाची नजर पण यांच्यावर पडलेली.. तो तसाच घरात पळाला. बहुतेक सोटा आणायला गेला असावा.

प्रसंग बाका होता. एक मिनिट इकडचा तिकडं झाला असता तर मला चालून आलेली संधी वाया जाणार होती. मी पण मग ना आव पाहीला ना ताव.. सुसाट पळत सुटलो.. आन् दुश्मन बोक्याला धु धु धुतला.. डॉलीचा मालक पण तेवढ्यात आलाच होता. आमची फाईटींग बघून तो काय मधी पडला नाही. एव्हाना दुश्मन बोक्याची फुगलेली शेपटी बर्यापैकी बारीक झालेली. पण गुरगुरणं चालूच होत त्याचं.

मी शेवटचा घाव घातला त्याच्यावर. त्या तडाख्यानं ते स्वांग पळून गेलं. एवढ्या वेळात मनात असूनपण मी तोंडातनं ब्र पण नाही काढला. नायतर डॉलीच्या मालकानं माझं विचित्र केकाटणं ऐकून मलाच सोटा घातला असता. मी विजयी मुद्रेनं डॉलीकडं पाहीलं. तिनं पण लाजून म्याव म्याव केलं. कान्या डोळयानं मग मी तीच्या मालकाकडं कटाक्ष टाकला. तो माझ्या जवळ येत होता.

हातात सोटा होता. माझं काळीज वरखाली होऊ लागलेलं. पण पाहु तर काय होते, असा विचार करून मी थांबलो. जवळ येऊन त्यानं मला उचललं आणि गोंजरायला लागला.. अहाहा.. मला जाम भारी वाटु लागलं होतं. मला घरी घेऊन जाऊन त्यानं दुध चपाती दिली. डॉलीपण मागून आली.

डॉली आणि मी एकाच ताटात दुध चपाती खात होतो. काय वर्णवू मी ते... मी गपचूप तिच्या गालांची पापी घेतली... अन् मागे सरकलो.. तिची प्रतिक्रिया जाणून घ्यायला.. ती कावरीबावरी होऊन इकडंतिकडं बघु लागली अन् माझ्याकडं बघुन स्माईल देऊ लागली. 'हेऽऽ बोक्या.. मांजर पटली रं पटली..' इतक्या दिवसांच्या मेहनतीचं आज चीज झालं होतं.

आता माझं जगणं फक्त डॉलीसाठी होतं. स्वतःला अजून जरा इम्प्रूव्ह करण्यासाठी मी वेगवेगळ्या टाईपच्या माणसांची संभाषणं ऐकायला लागलो. त्यात एका प्रेमी युगुलाचा पाठलाग केला. ती दोघं नेमकं काय बोलतायत ते ऐकायला. त्यांच्यातल्या हीरोच्या बोलण्यावरणं कळलं की 'ब्यॅन्ड स्ट्यॅन्ड' प्रेमी जोडप्यांचं आवडतं ठिकाण. तिथं म्हणे एका कठड्यावर बसायचं आणि वाहतं पाणी बघत प्रेमात हरवून जायचं.

'श्याऽऽ.. असलं काय ह्या चाळीच्या आसपास का नाही बुवा..?' माझा पूर्ण मूडंच निघून चाललेला ते ऐकून.. मग काय निघालो तिथनं परत.. एकतर अगोदरच त्या जोडप्याच्या मागं फिरत फिरत माझ्या पायाचा खुळखुळा झाला होता..

दुसर्या दिवसापासून माझ्या डोक्यात फक्त ब्यॅन्ड स्ट्यॅन्ड होता. तीन चार दिवस डोक्याचा भुगा केला, ‘कठडा आणि वाहत्या पाण्यानी..’ पण शेवटी मला यावरचा उपाय भेटलाच.. आणि मी डॉलीला आमच्या फर्स्ट डेटसाठी विचारलंच. तिनं पण लाजत होकार दिला.

इकडे डॉलीच्या घरात येऊन तिला पटवून मी तिच्या मालकासमोर अटकेपार झेंडं गाडलं होतं.. आणि आता त्याचाच घरजावई बनून राहीलो होतो. खाणं-पिणं-थोडफार झोपणं सासुरवाडीतच व्हायचं. घरात तशी डॉलीबरोबर माझी मस्ती चालायचीच.. त्यामुळं डेटवर एकत्र जायला काही प्रोब्लेम नव्हता..

आज डॉली तिच्या शेपटानं मला रोमँटीक मूडमध्ये आणू पाहत होती. फर्स्ट डेट होती ना ओ आपली.. मी जरा मधेमधे डोळं बंदच करू पाहत होतो. माझं लहानपणापासूनचं स्वप्न खरं झालं होतं. डॉली माझ्यासोबत डेटला.. आअऊ.. पंजा पण मारून पाहीला स्वतःला.. सगळं खरं होतं.. अगदी..

नुकताच उतरतीला चाललेला आकाशातला लालबूंद गोळा.. त्या तांबड्या आसमंतावर काळ्या अंधाराची शाल पांघरू लागलेली.. आमच्या डोक्यावर पसरलेल्या पिंपळाच्या फांद्यांची सुखद छाया.. थंडगार वाहणाऱ्या वार्याची झुळूक.. समोर वाहतं पाणी.. गटाराचं का असेना.. पण 'वाहतं' महत्वाचं.. त्यात अधूनमधून फिरणारी उंदरांची टोळी... कठड्यावर सोबत बसलेली ती..

'संगती सखी प्रिया...'

# माणूसपणाचा आधार

"ट्रिंग् ट्रिंग् ट्रिंग् ...... सकाळी फोन वाजला तसा अजयने उचलला. खरंतर त्याच्या रिंगचा गोंधळ रूममधल्या शांततेचा भंग करत होता म्हणूनच तो लवकर उचलला गेला. "हॅलो.... हा बोला...." अजय.

पलीकडून ओळखीचा आवाज ऐकला तसा तो अंथरुणातून उठून बसला. गावाहून आईचा फोन होता. पंधरावीस मिनिटं आईशी बोलून झाल्यावर त्याने आवरायला घेतलं. तसा रविवार असल्याने उठायला जीवावर आलेलं त्याच्या. पण आईच्या सांगण्यावरून अजयला लवकर तयार व्हायला हवं होतं. घड्याळ पाहीले तर नऊ वाजलेले. इतक्यात मामा येईल हे लक्षात घेऊन त्याने भरभर तयारी सुरू केली.

आईने सांगितले त्याप्रमाणे अजयच्या बाजूच्याच गावातल्या एका मुलीचे स्थळ सांगून आले होते. अजयच्या दूरच्या आत्याने मध्यस्थी करून त्याच्या नातेवाईकांसमोर आणि आईसमोर हा प्रस्ताव मांडला होता. अजयचे बाबा दोन वर्षांपूर्वीच आजारामुळे जग सोडून गेले होते. अजय मुंबईत कामाला तर गावी आई आणि लहान बहीण. त्याच्या या दूरच्या आत्याने नेहमीच यांना पाण्यात पाहीलेले. काही माणसं नाही का विनाकारण एखाद्याचं वाईट चिंतीत असतात. अगदी त्याच यादीतली ही दूरची आत्या. होणार्या पाहुण्यांची ईस्टेट, पैसा आणि दोन मुली, मुलगा नाही अशी छाप तीने अजयच्या आईकडे टाकली होती. आणि काही गोष्टी सोईस्कर जाणीवपूर्वक सांगायचं टाळले होते. कारणही तसेच होते. हे लग्न जमल्यास अजयच्या आत्याला एक लाख रूपये मिळणार होते.

इकडे अजयची आई आतापर्यंतच्या गरीबीमुळे यापुढे तरी मुलाचं भविष्य चांगलं होईल या भोळयाभाबड्या आशेने या प्रस्तावाला पाहत होती. तसं आईनं अजयला फोनवर सांगितले की "तू मामाबरोबर मुलगी पाहून ये, अन तुझं तू ठरव. कसलीही जबरदस्ती नाही." त्यासाठीच अजय तयार होत होता. मामा दहा वाजेपर्यंत येईल असे आईने सांगितले होते. लग्नाच्या विषयाने

नकळत अजयच्या मनात संमिश्र तरंग उमटत होती. किती पटापट हल्लीची काही वर्षे निघून गेली. आपली आजपर्यंतची वाटचाल हलकेच त्याच्या विचारांत तरळू लागली.

अजय... बाबांच्या जाण्यामुळे थोडं लवकर घरची जबाबदारी अंगावर घेतलेला होतकरू तरूण. सुरूवातीला तालूक्याच्या ठिकाणी एका कपड्याच्या दूकानात काम केले. पण पुढे बहीणीचे शिक्षण आणि भविष्यात लागणारी पैश्याची निकड जाणून मुंबईत आला. बीए पास अजय मामाच्या ओळखीने एका हाॅटेलचे कॅश काऊंटर सांभाळत होता. महीना सात हजार रूपये पगार. त्यात आपलं भागवून गावी पैसे पाठवायचे आणि वर शिल्लकही ठेवायची अशी तारेवरची कसरत कशीबशी तो सांभाळत होता. दोन तीन महीन्यातच तो तिथे चांगलाच रूळला होता. चाळीत मामाच्या वन रूम किचनच्या समोरच्या मंदीरात झोपायचीही सोय झालेली.

गरीबीच्या झळा सोसत अन् मन मारून जगण्याची सवय अंगवळणी पाडून घेत अजय समाधानाने आला दिवस ढकलत होता. कामात सर्वांशी अदबीने वागणे, ग्राहकांशी आदराने बोलणे आणि महत्त्वाचे म्हणजे त्याचा प्रामाणिकपणा यामुळे मालकही त्याच्यावर खुश होता. रोज येणार्या ग्राहकांशी अजय हसून बोलून राहायचा. बरेच ग्राहकही आपुलकीने त्याची विचारपूस करायचे. प्रतिभा मॅडमही त्यातल्याच एक होत्या. एक दिवस हॉटेलमध्ये दोन वेटर्सनी एकदम सुट्टी मारली. मग काऊंटर सांभाळत अजय ग्राहकांना जेवण सर्व्ह करत होता. प्रतिभा मॅडम सकाळी नाश्ता करायला म्हणून आलेल्या. त्यांची ऑर्डर घेऊन अजय निघाला तोच प्रतिभा मॅडमनी अजयला त्याच्या शिक्षणाबद्दल विचारले. अजय बीए पास असून त्याच्यातले पोटेन्शिअल आणि वागणूकीतले गुण प्रतिभा मॅडमनी हेरले होते. अजयला त्यांनी एक फोन नंबर आणि पत्ता दिला आणि दुसर्या दिवशी त्या पत्त्यावर इंटरव्ह्यूसाठी जायला सांगितले.

दुसर्या दिवशी अजय ठरलेल्या वेळेवर तिथे पोहोचला. एका मोठ्या रिटेल कंपनीचे सात मजली असे ते हेडऑफिस होते. एचआर रूममध्ये पोहोचल्यावर त्याने आतमध्ये पाहीले आणि आश्चर्याची एक छटा त्याच्या चेहर्यावर आली. प्रतिभा मॅडम आणि त्यांचे सहकारी आतमध्ये बसले होते. कंपनीत ज्यूनिअर बायरची जागा रिकामी होती. आणि त्यासाठीच प्रतिभा मॅडमनी अजयची वर्णी लावली होती. अजयची रूजू होण्यासाठीची सगळी औपचारिकता प्रतिभा मॅडमनी अगोदरच पूर्ण करून ठेवलेली. संबधित विभागातही तशी कल्पना त्यांनी दिली होती. अजयला आत बसवून प्रतिभा मॅडमनी त्याच्या हातात अपाॅईंटमेंट लेटर दिले आणि एक नजर मारायला सांगितले.

अजयने लेटर उघडून सर्व नीट वाचले, पगाराच्या आकड्यांत पंधरा हजार रुपये त्याने चारपाच वेळा तरी पाहीले. त्याच्या डोळयांत आनंदाश्रू येऊ लागले आणि प्रतिभा मॅडमकडे हात जोडून आभार मानायला तो पुढे सरसावला. त्याच्या चेहर्यावरचे हावभाव पाहून मॅडम बोलल्या... "कोणताही माणूस पैशाने, शरीररचनेने कधीच कमजोर नसतो, माणूस फक्त त्याच्यातल्या विचारांनी कमीअधिक प्रमाणात कमजोर वा शक्तीशाली होत असतो..." "मलाही असंच कुणीतरी हात दिला जेव्हा मी कमजोर होते..."

"तुलाही कोणीतरी भेटेल ज्याचं मन चांगल असेल पण काही कारणास्तव त्याला सावरणारं कोणी नसेल..." "अशा व्यक्तींना तू हात द्यायला विसरू नकोस..." प्रतिभा मॅडम.

फ्लॅशबॅकमधून बाहेर आलेल्या अजयच्या मनात प्रतिभा मॅडमचे ते शब्द ठळकपणे कोरले होते. त्या प्रसंगानंतर दोन वर्षे गेली. प्रतिभा मॅडम दुसर्या शहरात प्रमोट होऊन गेल्या. इकडे अजय त्याच कंपनीत परमनंट होऊन सिनीयर बायर झाला. पगारही पंचवीस हजारावर पोहोचलेला आणि वर परफॉरमन्स बोनस वर्षाला लाखभर रूपये मिळत होता. अजय आता कंपनीच्याच गेस्टहाऊसमध्ये राहत होता.

अंघोळ नाश्ता आवरून अजय तयार होऊन मामाची वाट पाहत बसला. दहा वाजता मामा आला आणि दरवाज्यातूनच त्याने अजयला घाईत निघायला सांगितले. थोड्याच वेळात ते मुख्य रस्त्यावर आले. मामाने सांगितल्याप्रमाणे मुलीचे वडील शहरात बर्यापैकी जम बसवलेले एक बिल्डर होते. कल्याणमध्ये त्यांचे स्वतःचे तीन फ्लॅट होते. शिवाय भाड्याने चालवायला दिलेले एक गॅरेजही होते. मुळचे अजयच्याच बाजूच्या गावातले. गावीही मोठा बंगला बांधला होता. मुलीला एकच लहान बहीण. आईवडील आणि दोन मुली असा त्यांचा संसार.

साधारणतः एक तासात अजय आणि मामा मुलीच्या घरी पोहोचले. मुलगी अगोदरपासूनच सोफ्यावर येऊन बसली होती. छान फिकट हिरव्या रंगाच्या साडीत तिचा गौरवर्ण अधिकच खुलून दिसत होता. मोजूनमापून केलेला हलकासा मेकअप तिच्यातल्या साधेपणाचा परीचय देत होता. अजयला पाहता क्षणीच ती आवडली होती. ओळखपाळख होऊन कांदेपोहेंचा कार्यक्रम सुरू झाला. पण कांदेपोहे घेऊन नोकर आला आणि अजयच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. मुलीच्या बाबांनी अजयच्या चेहर्यावरचे भाव ओळखून लगेच विषयाला हात घातला.

"बघा अजयराव, पैश्याची काहीच कमी नाही आम्हाला." "आणि आमची पोरगीही सरळ संमजस आहे. तुम्हाला लग्नानंतर कोणत्याही गोष्टीची कमी पडणार नाही..." मुलीचे बाबा.

अवाक् होऊन ऐकत असलेल्या अजयने त्यांना विचारले.. "म्हणजे नेमके कश्याबाबतीत बोलावयाचे आहे तुम्हाला."

मुलीचे बाबा पुढे बोलले.. "म्हणजे बघा, तुमचं कामाचं स्वरूप, तुमचा स्वभाव, तुम्ही कुठे राहता याची सगळीच माहीती मी अगोदरच गोळा केली आहे. लग्नानंतर कल्याणमधलाच आमचा एक फ्लॅट तुम्हाला मिळेल शिवाय एक गॅरेज आहे ते पण तुमच्या नावे.. बाबांचं वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच मुलगी सोफ्यावरून उठून त्यांच्याकडे लंगडत जाऊ लागली. हो.. ती एका पायाने अधू होती. बाबांना शांत करून ती अजय आणि त्याच्या मामाकडे वळून पाहू लागली. मामाला याची पूर्वकल्पना होतीच. अजयने तीला छानशी स्माईल देऊन विचारले... "आपण दोघेच बोलू शकतो का?"

मुलीने प्रश्नार्थक नजरेने बाबांकडे पाहीले. त्यांनीही मानेनच हॉलच्या बाहेर असलेल टेरेस दाखवलं.

हातात पोह्यांची डिश घेऊन अजय आणि ती टेरेसवर होते. "तुमचं नाव? .. अजय. "वेदान्ती.." ती उत्तरली. अर्धापाऊन तास त्याच्यात एकमेकांविषयी चर्चा झाली. वेदान्ती या नावाबरोबरच तिचा मनमोकळा आणि स्पष्ट स्वभाव अजयला भावला. तिनं सगळे सांगितले त्याला की ती जन्मापासूनच एका पायाने अपंग आहे. ऐम कॉम पूर्ण केलेलं. कॉलेजमध्ये झालेले एकतर्फी प्रेम पण विचारण्याची न झालेली हिम्मत ईथपासून ते बाबांनी आतापर्यंत आणलेली तीन चार स्थळ या सर्वात मनातून खचलेली ती. आता तीची लग्न करण्याची मूळात इच्छाच नव्हती पण बाबांच्या आग्रहाखातर तीला हे सर्व मानावं लागत होतं. "अन् आज तर बाबा सरळसरळ तुमच्यापुढे आर्थिक व्यवहाराच्या भाषेत बोलत आहेत जणू मी त्यांनाही इथे जड होऊ लागलीयं... " तीने मन मोकळं केले.

डिशमधला पोह्यांचा शेवटचा घास खाऊन अजयने विचारले.. "पोहे तू बनवलेत का..? " त्याच्या विषयापासून भरकटलेल्या प्रश्नावर किंचितसं गोंधळून तीनं "हो" म्हणून सांगितले. "पोहे माझा जीव की प्राण आहेत..." तो. "म्हणजे अगदी रोज जरी कोणी मला पोहे खाऊ घातले तरी मी आनंदाने खाईन, अन् त्यातही ते इतके स्वादीष्ट कोणी बनवणारं असेल तर सोने पे सुहागा..." उरलंसुरलं सगळं मनातलं बाहेर काढत अजयने वेदान्तीला प्रतिभा मॅडम विषयी सर्व सांगितले.

"आणि हो मला तर तू पाहताक्षणीच पसंत पडलेयस, अर्थात तूझं मत तू कळवू शकतेस." "तुझा होकार असेल तर सांग मला थोडी तयारी करावी लागेल." "तसंही मी तुझ्यापेक्षा थोडा कमी शिकलेलो आहे मग बाहेरून मला ॲडमिशन घ्यायला हवे का ॅलेजला..." अजय.

वेदान्तीने कल्पना केली नव्हती अजय असे काही बोलेल याची. मनातून ती फारच आनंदी होती पण तरीही कसलेतरी दडपण तिच्यावर होते. पुढे अजून स्पष्टीकरण देत अजय म्हणाला.. "पहा वेदान्ती, तू सुरूवातीपासूनच स्वतःमधल्या उणीवांचा विचार करत राहीलीस. कदाचित तुला तुझं कॉलेजमधले प्रेम मिळालं ही असतं पण तु ते व्यक्त केले नाहीस अन् स्तःमध्येच उणेपणा बघत आलीस. काय झालं की तू ही अशी आहेस, तुझ मन तर कमजोर नाही ना.. मग कशाला फुकाचा न्यूनगंड बाळगून राहायचे. आणि हो आता हे पण लक्षात घ्या की सध्या शिक्षणाने मी तुझ्यापेक्षा उणा आहे मग निर्णय तुझा आहे." अजयने प्रेमळ चतुराईने स्वतःला तीच्याहून कमी लेखले होते.

वेदान्तीच्या मनात अजयला नकार द्यायला कुठे जागाच नव्हती. तरीही अजून होकाराचा निर्णय द्यायला ती कचरत होती. काही न बोलता ती आत हॉलमध्ये आली. मागोमाग अजयही आला. इकडे वेदान्तीचे आईबाबा आतुरतेने अजयच्या निर्णयाची वाट पाहत होते. थोडावेळ शांततेत गेल्यावर अजयने त्याच्या मनातलं वेदान्तीच्या आईबाबांसमोर मांडले. पुढे अजून पुष्टी करत अजय बोलू लागला...

"खरंतर मी इथे लग्नासाठी फक्त मुलगी बघायला आलो होतो. पण आताच मला घाईत माझ्याकडून होकार कळवावा लागला. याला कारणही तसेच आहे, तुमची मुलगी खरंच खुप गोड स्वभावाची आहे. तुमचा फ्लॅट, गॅरेज यापैकी मला काही नको किंबहुना मी त्या अपेक्षेने आलेलोही नाही. मला इथे आल्यानंतरच तुमच्या मुलीविषयी कळाले. आणि तुमच्या मुलीशी पहील्या भेटीतच मला लव्ह ॲट फर्स्ट साईट काय असते याची कल्पना आली.." "आज किंवा भविष्यातही तुमच्याकडून काही घेऊन मी माझ्या प्रेमावर स्वार्थाचे मळभ नाही पसरवू शकत. तुमच्या मुलीला जमेल तसे खुश ठेवण्याचे सर्व प्रयत्न मी माझे करेन."

अजयचा एकएक शब्द वेदान्तीच्या आईबाबांना कृतकृत्य करून जात होता. अन् मघापासून वेदान्तीच्या होकारात आड आलेली तणावाची हलकीशी रेघ हळूहळू पुसट होत जात होती. तिच्या मनात अजयबद्दल आपुलकी आणि आदर या दोन्ही भावना एकाचवेळी निर्माण झाल्या.

पुन्हा सर्वांसमोर स्पष्टपणे अजयने वेदान्तीला विचारलं... "विल यू मॅरी मी...?"

वेदान्तीच्या होकाराने घरातलं सगळं वातावरण आनंदमय झालं. तीची लहान बहीण मिठाईने सर्वांचं तोंड गोड करू लागली.

अजयला त्याच्या हलाखीच्या दिवसात प्रतिभा मॅडमनी त्याला दिलेला माणूसपणाचा आधार आठवला.

# हवेत उडणारी मुलगी

काल बर्याच वर्षांनी सर्कस पाहायचा योग आला. झाले असे की, गेल्या आठवड्यात माझा लाडका भाचा ईशांत.. शाळेतून एक डिस्काऊंट कुपन घेऊन आलेला. शहरात 'अमर सर्कस' नावाची सर्कस आली होती अन् त्याचे पन्नास टक्के डिस्काऊंट कुपन शाळेत विद्यार्थ्यांना वाटण्यात आले होते. सात वर्षांचा माझा भाचा सर्कस पाहण्यासाठी खुप उत्सुक होता.

सर्कस पाहण्याच्या उत्साहापेक्षा त्याने काहीतरी फायद्याची गोष्ट आणली आहे, हा भाव त्याच्या चेहर्यावर होता. मोठी माणसं नाही का, भाजी वगैरे घेताना दोन पाच रूपये घासूनघासून कमी केले की घरी येऊन रूबाबात सांगतात.

अगदी तसेच काहीतरी ईशांतच्या चेहर्यावर होतं. असो, रविवारचे मी त्याला सर्कस दाखवायचे कबूल केले. तसेही संक्रांत असल्याने घरी हळदीकुंकुचा कार्यक्रम होता. घरी ओळखीच्या बायकांची लगबग होती. म्हणून मग मी आणि ईशांतने आमची संध्याकाळ 'अमर सर्कस' पाहण्यात व्यतीत केली.

जाण्याआधी मला वाटलेले की माझ्यासाठी सर्कस आता थोडी बोरींग होईल. पण सर्कस चालू होऊन जसजशी त्यांची थीम चेंज होत गेली तसतशे त्यांचे एकएक प्रयोग पाहण्यात मजा वाटू लागली. दोन बुटके विदूषक, रबरी अंगाचा मुलगा(तो थोडा जास्तच लवचिक आहे), संगीताच्या तालावर आपला लयबद्ध नृत्याविष्कार करणार्या सुंदरी, सहा निरनिराळया प्रजातिंचे डाॅगी आख्खा रिंगण लोकांची करमवणूक करत फिरत होते.

बाजूला ईशांत मस्तपैकी पाॅपकाॅर्न खात सर्कसचा आनंद उपभोगत होता. आणि मीही माझ्या लहानपणाच्या उंबरठ्यावर अगदी येऊन पोहोचलोच होतो, फक्त दरवाजा उघडायचे बाकी होते. पण मला फारकाळ ताटकळत नाही राहावे लागले. समोर सर्कसमध्ये लाईटस् ऑफ झाल्या अन् एका सुंदर तरूणीची इन्ट्री झाली. सर्वांना अभिवादन करत तिने आपली कर्तबं मांडायला सुरुवात केली. वर लटकवलेल्या दोन रेशमी कपड्यांनी आधार घेऊन ती हवेतच एक एक कसरत करत होती. हवेत फिरता फिरता तिचा चेहरा माझ्या स्टॅंडला सामोरा आला...

जणू तिने धक्का दिला, आणि दरवाजा उघडला.. हो माझ्या बालपणाचा (आणि बालिशपणाचाही).

मी सहावीत होतो तेव्हा. असंच फ्री तिकीटावर मला माझा शेजारी सर्कस पाहायला घेऊन गेलेला. आम्ही राहायला तेव्हा विक्रोळीला होतो आणि सर्कस भांडूपमध्ये. त्यावेळी तिकडे जाणारी एकच ६०३ नंबरची बस ठराविक अंतराने मिळायची. बसने आम्ही दोघे सर्कसच्या ठिकाणी गेलो. त्या सर्कसचे नाव नक्की आठवत नाही. मी सर्कशीतल्या प्रयोगांचा मनमुराद आनंद लुटत होतो. माझ्या शेजार्याने मध्येच आम्हा दोघांसाठी कॅन्डीही घेतली.

आयुष्यात प्रथमच सर्कस पाहण्याचा विलक्षण हर्ष माझ्या मनात होता. त्यात भरीस कॅन्डी मग मी ती खाताना आजूबाजूला बसलेल्या समवयस्क मुलांकडे ऐटीत पाहत होतो. त्यातल्याच एकाने मग त्याच्या आईकडे कॅन्डीसाठी भोकांड पसरवले. असो अश्या गमतीत असतानाच समोरच्या लाईट्स बंद झाल्या.

निळया रंगाच्या टाईट कपड्यात साधारण दहा वर्षांची एक मुलगी रिंगणात आली. रिंगणाच्या छपराखाली खुपश्या तारा बांधलेल्या आणि त्यांनाच लटकवलेल्या चार ओढण्या. या मुलीने दोन हातात दोन ओढण्यांची टोकं पकडली अन् हवेत झोका घेतला. हवेत उडतच ती वेगवेगळया कर्तबी लीलया दाखवू लागली. मी डोळे फाडून तीच्याकडे पाहत होतो. "ही तर चक्क उडतेय...." - अवाक् झालेला मी मनातच पुटपुटलो. तीच्या हरएक हालचाली सपासप वार करत होत्या माझ्यातल्या विचारशक्तीवर. आश्चर्य, कौतुक, रोमांच आणि भीती (ती पडेल की काय याची) सगळयाच भावना एकाचवेळी मनात आल्या होत्या.

पाच मिनिटं हा चमत्कार मी पाहीला. लाईट्स ऑन झाल्या आणि आता तिची निरोप घेण्याची वेळ आली. सगळीकडे नजर फिरवत लोकांना अभिवादन करत ती माझ्या स्टॅंडकडे वळली. मी खुर्चीतून उठून जोरात हात हलवून तीच्या अभिवादनाला उत्तर दिले, तिने हात हलवतच डोळा मारला आणि निघून गेली. बास्स काळीज घायाळ केलं तिनं या हरकतीने. तिला त्याचवेळी पळत जाऊन पकडावं अस खुप मनात आले. पण शेजारी बसलेल्या माझ्या शेजार्याला काय सांगायचं म्हणून नाही गेलो.

घरी येईपर्यन्त माझा शेजारी काय न काय महाभारत सांगत होता आणि मी पोवाड्यातला कोरस बनून "जी..जी.." करत होतो. माझ्या डोक्यात राहून राहून तीच हवेत उडणारी मुलगी येत होती. अभिवादन करत होती, डोळा मारत होती. घरी पोहचून गचागच कायतरी खायचे म्हणून खाल्ले. आणि बाहेर पडून मैदान गाठले. तिथे एक कोपर्यातली जागा पकडली अन् पुढचा विचार करू लागलो. या दरम्यान माझ्यातल्या विचारांची आपापसांत चांगलीच खडाजंगी झाली ती पुढीलप्रमाणे....

"इतक्या लोकांतून तीने मलाच का डोळा मारला." "खरंच मी आवडलो असेन तीला?" "प्रश्नच नाही उगाचच डोळा मारेल का ती." "मी पाहीले तीने सर्वांना अभिवादन केले पण मला पाहूनच फक्त डोळा मारला." "काहीतरी बात नक्कीच आहे आपल्यात." "कदाचित यामुळेच ती माझ्यावर पाहताक्षणीच फिदा झाली असेल.."

"जाऊ दे, काहीही कारण असू दे.. तिने मला डोळा मारला म्हणजेच तिने तिच्या माझ्यावरच्या प्रेमाची कबूली दिलेय." "ती थोडी मोठी वाटतेय पण माझ्यापेक्षा. मग काय झालं चालतं तेवढं." "मम्मीच बोलली होती एकदा, सचिन तेंडुलकरची बायको पण त्याच्यापेक्षा मोठी आहे म्हणून." "मग त्यात काय." "शाळेचं कायं.. आणि आत्ता लग्न...?" "अरे नाहीतरी घरी बोलतातच की आता ह्याच लग्न केल पाहीजे म्हणून." (घरातलं शेंडेफळं म्हणून त्यांनी केलेली अन् मला त्यावेळी न समजलेली चेष्टा). "आणि त्या दिवशी तात्यांनी (काकांनी) पण डाफरलं की तुझं लग्न करायचं वय आलं तरी छोटीछोटी काम येत नाहीत."

खुप विचार केला आता उठून कामाला लागलंच पाहीजे." "आता माझी पाळी आहे, तिला जाऊन घरी आणायचं आपल्या." "बास्स आपल्याला बाकी काय माहीत नाही. घरी काय कोण नाही बोलणार नाही." "सर्कशीतली आहे ती अन् ते पण उडणारी मुलगी." "मम्मीपप्पा तिला बघुनच खुश होतील आणि जेव्हा ती मला धरून उडेल तेव्हा ते पण खुश होतील आम्हाला उडताना बघुन." "बरं झालं ती मोठी आहे ते. माझं वजनपण कमी असेल तिच्यापेक्षा. मग मला धरून उडायला तिला जास्त त्रास होणार नाही." "ठरलं उद्याच जाऊन तिला घरी आणायचं."

रात्रीचे नऊ वाजायला आले असतील मी मैदानातून निघून घरी आलो. दुसर्या दिवशी दुपारी शाळा सुटल्यावर घरी आलो. पटापट आवरून खेळायला जातो सांगून निघालो. कुठेकुठे साठवून ठेवलेला बारा रूपयांचा खजिना हाल्फचड्डीच्या खिश्यात भरला होता. एकटाच जायचे असं ठरवूनच चाललो. याअगोदर एकटा कधी ऐरीया सोडून बाहेर गेलो नव्हतो. पण तरी बिनधास्त होतो बायको आणायला जायचे म्हणून. चालत चालत एरीया संपला आणि बस स्टॉप आला. अगदी थोड्याच प्रतिक्षेनंतर बस आली. तीच ६०३.. लक्षात होते कारण ती एकच ६०३ नंबरची बस भांडूप ईस्टला जायची. बसमध्ये शिरलो, नशिब गर्दी नव्हती. शेवटची खिडकीची सीट पकडून शांत बसलो.

तेवढ्यात खाटखुट करत कंडक्टर जवळ आला. रोज प्रवास करत असल्याच्या आविर्भात मी एक एक रूपयांची पाच नाणी त्याच्यापुढे केली. तिकीट फाडून त्याने मला संपूर्णतः न्याहाळले आणि त्याच्या जागेवर जाऊन बसला. साधारण वीस मिनिटात मी स्टॉपवर उतरलो, बस पुढे

निघून गेली. तिथून चालत दोनच मिनिटावर मैदान होते जिथे सर्कसचे खेळ होत होते. रस्त्यावर लावलेल्या सर्कसच्या पोष्टरवरील विदूषकाला मी तोंड वाकडे करून चिडवू लागलो. तुझी मैत्रीण मी पळवून नेणार असे मनातच त्याच्याशी बोलत होतो.

चालत चालत मी ईच्छित स्थळी पोहोचलो. पाहतो तर काय... तंबू उखडलेला, एका ट्रक मध्ये बांबू, ताडपदरी आणि काय काय साहीत्य भरलेले. पाच-सहा जण उरलेलं किडूकमिडूक घेऊन ट्रकमध्ये टाकत होते. मी नुकताच तंद्रीतून बाहेर आलेल्या बुजगावण्यासारखा त्यांना पाहत होतो. काहीच न बोलता गप्प ठोंब्यासारखा एकेकाच्या हालचाली टिपत होतो. त्यांचे सामान भरून ट्रक निघायला लागला तसा मी पळत जाऊन एकाला विचारले, "सर्कस कुठे गेली." तो शांतपणे म्हणाला.. "दुसर्या जागी .. नेरूळला." मी तयारीत असल्यासारखाच पुढचा प्रश्न केला.. "अन् बाकीची माणसं..?". "ती सकाळीच गेलीत.." तो उत्तरला.

खिन्न मनाने मी तिथून निघू लागलो.. नेरूळ माझ्या आवाक्याबाहेरचे होते. डोळयांत पाणी भरून यायला लागले होते... पुन्हा परतीच्या रस्त्यावर त्याच पोष्टरवरच्या विदूषकाला पाहीले.. तो विदूषक माझ्या अवस्थेवर हसत होता. त्याच्यावरून नजर फिरवून मी झपाझप पाऊलं टाकू लागलो. बस स्टॉपवर आलो. बस आली तसा निघालो. पाच रूपयांचे तिकीट काढले. बसमधली वीस मिनिटं खुप वाईट मनस्थितीत गेली. उतरून तडक घरी आलो. उरलेले दोन रूपये रिकाम्या खजिन्याच्या पेटीत पुन्हा ठेवले. थोडसं खाऊन खेळायला गेलो.

"मामू, चल सगळे निघाले.... ईशांतने हात ओढून सांगितले. मी भानावर येत समोर पाहीले. सर्कशीचा खेळ संपला होता. ईशांतला घेऊन मी गर्दीतून वाट काढत बाहेर आलो.

घरी पोहोचेपर्यंत मनाला विचारत होतो, त्यावेळच्या माझ्या वयाची तुलना करता, असला प्रसंग मी इतकी वर्षे कसा काय विसरलो होतो. अन् नेमका हा मेंदूच्या कोणत्या कोपर्यात दडून बसला होता. हा प्रसंग आजपर्यंत ना घरी माहीत पडला ना कधी कोणासमोर मांडला. कदाचित त्यामुळेच तो माझ्या आठवणींतही धुसर होऊन गेला. असो, ईशांतला सर्कस दाखवण्याच्या निमित्ताने मलाही माझी लहानपणीची सर्कस आठवली. आणि हो तीने प्रेक्षकांमध्ये पाहून डोळा मारला होता.

## "ती जाते तेव्हा..."

"कालपर्यंत सर्व छान होतं मग आज अचानक असं काय झालं", मनात राहून राहून विचारांच काहूर माजलेलं. डोकं हळूहळू सुन्न होत चाललं होतं. "असं कसं होऊ शकतं, अगदी कालचीच रात्रसुद्धा प्रेमाच्या वर्षावात आम्ही न्हाऊन गेलेलो". "सगळं काही आलबेल होतं तरीही का...?"

"च्या आयला, डोक्याचा भुगा होत आहे....? "का माझी मेंदूची नस फाटणार तर नाही ना..." सर्र्र्र्र्... अंगातनं काटाच गेला...." "अर् नको, त्यापेक्षा मी आत्महत्या करतो"

"मी जातेय......." तिचे शब्द कानांच्या ओबडधोबड एकेका पाकळीवर आदळत स्वतःचेच प्रतिध्वनी निर्माण करत अजूनही कानावरच रेंगाळत होते. आणि ते ऐकत ऐकत माझ्या मनातही तशीच वादळं घोंघावत होती.

"ती....." वर्ष पण झालं नव्हतं आमच्या लग्नाला.. मस्त चालला होता आमचा सुखी संसार.. ज्यात रग्गड नसला तरी मजा मारण्याइतपत तर नक्कीच पैसा होता. सर्वकाही दोघांच्या मनासारखेच चालले होते. सात महिन्यांपूर्वीच लव्ह मॅरेज झालेलं अन् आज हे असं....

काही कळायला मार्ग नव्हता. मी तिच्याकडे पाहीले, माझ्याकडेच चेहरा करून झोपलेली. 'किती निरागस चेहरा... गालावर आलेल्या तीच्या केसांचा झूबका मी मागे केला. पून्हा वर छताकडे डोळे करून मी माझ्याच विचारात हरवलो. "नाही, मला आता कारण शोधावेच लागेल की नेमकं ही मला सोडून का जातेय." माझ्या विसरभोळेपणामूळे कदाचित.. पण नाही.." , "मी तितकाही काही विसरत नाही फक्त शंभरातल्या चारपाच गोष्टी सोडल्या तर..." "अरे हो, पण त्याच चारपाच गोष्टी महत्वाच्या असतात..." मी स्वतःच प्रश्न आणि उत्तर खेळत होतो.

अचानक आठवलं, मी जरा जास्तच काळजी करायचो तिची. अन् नेमकं हेच तीला आवडायचं नाही. म्हणजे समजा ती कुठे नवीन अनोळखी जागी गेली आणि तीचा मोबाईल नाही लागला तर माझा जीव वरखाली होतो. अन् घरी आल्यावर तीला जाब विचारला तर बोलायची.. "एवढं काय त्यात..", "झाला मोबाईल बंद..".. ओल्या हातांनी लाईट लावणे, ट्रेनमध्ये दरवाज्याजवळ उभे राहणे इत्यादी इत्यादी. असे बरेच किस्से असायचे. असो तीला माझ्यातल्या

या गोष्टीचं कौतुकही वाटायचं आणि रागही यायचा. कधीकधी चिडायची "किती समजावतोस रे..! मी काय लहान आहे का?" कधी प्रेमाने बोलायचीही, "तू जितका मला जपतोस तितकीही मी लहान नाही.." "पण तूझ्याशी लग्न करून मला माझं लहानपण पुन्हा अनुभवायला मिळतय."

ते ऐकून मध्येच माझ्यातला बाप जागा व्हायचा. हो.. आहेच माझं प्रेम तिच्यावर तितकं. ती नजरेआड झाली की जीव कासावीस होतो.. नाही करमत तिच्याशिवाय.. नकळत तिला दुखू-खूपू नये म्हणून तळमळतं मन. ती नाहीतरी बराच हलगर्जीपणा करते स्वतःबाबतीत. जेवण बनवताना तेलच काय हातावर उडवेल, भाजीसोबत बोट काय कापेल. मग काय मलाच नको का घ्यायला तिची काळजी..

असाच मी तीला जपण्याचा शक्य तितका प्रयत्न करतो.. ओहह् हेच कारण असू शकेल.... एखाद्याला आवडतं कुणी आपली काळजी केलेली.. पण ते जास्त झाले की मग कुठेतरी टोचायला लागतं. आणि मला वाटतेय माझ्याबरोबर तेच झालेय.. मी जरा जास्तच तर नाही करत ना कधी कधी.. तीने सांगितलेल्या आणि माझ्या मनाप्रमाणे तीचे नूकसान करणार्या (तीच्या मनाप्रमाणे एकदम क्षुल्लक) छोट्याशा गोष्टीही मला मोठ्या वाटतात.

पण आजचं सगळंच वेगळं होतं. ती मला सोडून जाणार.. म्हणजे सर्व संपल.. तीने सांगितल्यापासून मनाची ही चलबिचल चालू होती. आणि सुरूवातीपासून ते आतापर्यंत जे काही तूम्ही वाचलेय ते धडाधड एक संपले की दूसरे माझ्या डोक्यात अग्नीवर्षावासारखे आदळत होते.

मन भरून आलं होत.. तीला उठवावे आणि सांगावे की "नको जाऊस मला सोडून.. मला गरज आहे तूझी..." पण गाढ झोपेत असलेल्या तीला उठवणं मला जमणारं नव्हतं. एकतर उगाचच तीची झोपमोड झाली असती, आणि दूसरं म्हणजे माझं मन मोकळं करायला तिला उठवणं स्वार्थीपणाचं ठरलं असते. डोळयांत गंगा यमुना आणण्याइतपतं फिल्मी भाव नव्हता पण भावना खर्या होत्या म्हणून झेलमला आज इथेच उगम मिळणार होता...

ती उठल्यावरचं बोलू असे म्हणत डोळे बंद केले.. अगदी घट्ट.... मनात आता कसलाच विचार नको... बास्स.. जे काही आहे ते उद्या सकाळीच बोलायचे. शक्य तितका ताण डोळयांवर आणला, दोन्ही कानावर हात ठेवला.. स्वतःचाच आवाज अजूनही कानावर येत होता...

पण आता त्याचबरोबर आणखीही काही ऐकू येत होते.. अस्पष्ट आवाज.. हळूहळू मोठा होत चाललेला.. अगदी खरं.... तिचाच होता तो आवाज...

"काय करतोयस................." हे स्पष्ट ऐकू आले.. कारण हे शब्द कानावर पडायला आणि चेहर्यावर पहील्या पावसाचे दवबिंदू पडायला एकच वेळ साधून आली होती. गालावर हलके स्मित पसरले अगदी नकळत.. काहीच माहीत नसताना.. डोळे उघडले,

तीच्या ओल्या केसांतले दवबिंदू तिने पून्हा माझ्यावर उडवले... खडबडून जागा होणार तोच ती म्हणाली, "मला कल्याणपर्यंत सोडायला येणार आहेस ना.. ट्रेन सुटेल, आवर पटापट.."

अख्खा एल्ईडी डोक्यात पेटला.. अन् करंट त्याच्या नेहमीच्याच वेगाने वरून खाली पूर्ण अंगातून वाहून गेला. तीचं तिकीट एक महीना आधी मीच ऑनलाईन बुक केलं होतं. दहा दिवस तिच्या आईकडे राहून येणार होती.

गेला आठवडाभर दिवस मोजत होतो. जसजसा दिवस जवळ येईल तसतसं मनात तेच विचार.. वेडा मी... अगोदरच तिच्याबाबतीत थोडा हळवा आणि प्रोटेक्टीव्ह. "उद्या" ती जाणार म्हणून काल दिवसभर डोक्यात ती.. ती... आणि तीच...

ती जाणार हे मेंदूने चांगलेच लक्षात ठेवले.. "ती जाणार" या कर्ता आणि क्रियापदांमधे बिचारा मेंदू इतका अडकला की "तीच्या आईकडे" कर्म विसरला...

बाकी काल रात्रीचं स्वप्नातलं महाभारत तूम्ही जाणताच.....

# छेडीत जाऊ आज प्रीत..

"निदान भरलेला टीफिन तरी उचलून बॅगेत ठेवत जा..... कसलाच कामात मदत करत नाहीस.." तीच्या डोळयात निखार्यांची लाली व मुखात कामाची दगदग आणि नवर्यावरचा राग स्पष्ट दिसत होता. सकाळी सकाळी बायकोचं असं रौद्ररूप पाहून मोहन चांगलाच बावचळला होता. नक्की हिला झालेय काय.. हे कळायला थोडा वेळ लागणार होता. म्हणूनच नजर खाली करून त्याने किचनमध्ये प्रवेश केला. तोपर्यंत साक्षीची बडबड चालूच होती. मोहन थोडा घाबरतच टिफीन उचलायला खाली वाकतोच तेवढ्यातच शरणागती पत्करलेल्या हरणावर झडप घालणार्या वाघिणीसारखी साक्षी समोर आली. त्याचा हात पकडून त्याला स्वतःसमोर अक्षरशः फिरवले अन् पुन्हा डरखाळ्या फोडू लागली.

"तुला हजारवेळा सांगितलेय तुझं कोणत्या मुलीशी बोलणं मला सहन होणार नाही.. मी म्हणतेय काय गरज काय होती तुला तिला भेटायची...? आणि तेही ऑफिसच्या बाहेर..? काय म्हणे तर कामानिमित्त बोलण्यासाठी जातायत.."

मोहन शांत राहून शब्दांचे वार झेलत होता. त्याला पाऊस खुप आवडायचा. पाऊस सुरू झाला की स्वारी पावसाचे असंख्य थेंब अंगावर घ्यायची. स्तब्ध उभा राहायचा मग तो.. जणू पाऊसाच्या हवाली करून द्यायचं स्वतःला. एक वेगळाच आनंद मिळायचा त्याला त्यात.

आताची परीस्थितीही थोडीफार अशीच होती. पावसासारखीच साक्षी बरसत होती. अन् आमचा हीरो तीच्या शब्दांच्या अगणित सुया टोचून घेत होता. नेहमीसारखंच स्तब्ध.. पण यावेळी पावसाऐवजी तीच्या हवाली केलेलं स्वतःला... आणि हो यात एक वेगळाच मनस्ताप मिळत होता त्याला. म्हणजे मघाच्या टिफीनपुराणामागे हा हेतू होता तीचा..

पाहूया नेमकं घडलंय काय ते... त्यासाठी आपल्याला थोडं मागे जावं लागेल... चला तर मग..

कालचा दिवस :-

काल मोहनला घरी यायला तब्बल एक तास उशीर झाला. झालं असे की ऑफिस सुटतानाच त्याची रेखा नावाच्या क्लाईंटशी गाठ पडली. बाहेर येता येता क्लाईंटने मोहनला कॉफीची ऑफर दिली. अहं.. तसलं काही अजिबात नव्हतं दोघांच्याही मनात.. ऑर्डर घेणेदेणे संदर्भात दोघांच्याही फायद्याच्या गोष्टी बस्स.. बाकी काही नाही. त्यातच हा एक तास भुर्कन उडून गेला. तसा मोहनला घरी जायला कधी उशीर व्हायचा नाही. नेहमीचा सातचा ठोका ठरलेलाच त्याचा. पण आज आठ वाजलेच त्याला. घरी पोहोचून शुज काढताच साक्षीनं पाणी दिलं. पाणी प्यायला ग्लास वर करणार तोच तीनं प्रश्न केला.. "उशीर कसा झाला...?"

मोहनने सांगितलं सगळं काही जे घडलं ते. साक्षीनं ही मग छान मूडमध्ये येऊन रेखाबद्द्लची माहीती विचारली. मोहन आणि रेखामधले सर्व संभाषण, रेखाने घातलेले कपडे, तिचं दिसणं आणि बरंच काही मोहनरावांनी जेवढं माहीत होतं तेवढं विश्लेषण करून सांगितलं. अर्थात साक्षीने तीला मोहनच्या कामात खुप इंटरेस्ट आहे असं दाखवतच हे सगळं खोदून काढलं. आणि मोहनने कर नाही तर डर कशाला अश्या अविर्भावात सर्वकाही मांडलं. नेमका इथेच सगळा घोळ झाला...

दोन वर्षे झाली असतील साक्षी आणि मोहनच्या प्रेमविवाहाला. दोघं एकदुसर्याला पुरेपुर जाणणारे. अगदी मनकवडेच ते एकमेकांपुरते. मोहन दोन स्वभावाचा.. एक अख्ख्या जगासाठी स्मार्ट, हजरजबाबी अन् चपखल. कोणाच्याही तावडीत सहसा न सापडणारा. दुसरा अगदी उलट साक्षीसाठी. बाहेरच्यांसाठी अंगावर चढवलेली चतूर कोल्ह्याची कातडी घरात पाय ठेवताच काढून ठेवायचा तो. शंकाच नाही की तो साक्षीला घाबरून असायचा. दुसरीकडे साक्षी... बेधडक, तडक, प्रेमळ, रागीट असे सगळेच भाव प्रसंगाला अनुसरून मोहनवर बरसवायची. बाकी सर्वांसाठी मात्र ती फक्त मायाळू होती.

तुझ्याशिवाय करमेना सारखाच दोघांचा जीव होता एकमेकांवर. त्याला माहीत होतं की ही माझ्यावरच्या तीच्या प्रेमामुळेच कधीकधी रागावते. आणि तीलाही माहीत होतं माझ्याशिवाय या मोहनवर कुणाचीही मोहीनी होणार नाही. पण तरीही तीला राग यायचाच .. कारण स्पष्ट होतं...

आज : -

"माझा तुझ्यावर विश्वास आहे पण आजकालच्या मुली भस्सकन अंगावर येतात रे.... उद्या तुझा कोणत्या मुलीने विनयभंग केला तर..?" बॅगेत टिफीन भरत साक्षी अजूनही थोड्या त्रासिक आणि तितक्याच चिंतीत स्वरात म्हणाली. मोहनने सुरूवातीपासूनच शस्त्रास्त्रे टाकली होती मग भांडण्यात काही अर्थच उरला नव्हता. म्हणूनच एव्हाना तीचा राग कमी कमी होत चाललेला.

"अगं काही काय बोलत आहेस..." मोहन. आता मात्र तो चांगलाच वैतागला होता. खुप झाले आता.. अरे काही सेल्फ रिस्पेक्ट असतो की नाय राव... मोहन प्यारे उचल बॅग आणि नीघ इथून. "चाललो मी..." म्हणत मोहन घराबाहेर पडला.

'सर्व खपतं मला. हीचा राग, संताप सगळं सगळं मी मुकाट्याने ऐकून घेतो. पण हिचं असे हेल्पलेस होऊन गेलेलं नाही आवडत मला. ओरडत होती तिथपर्यंत ठिक होतं कशाला शेवटचं वाक्य सुनाऊन इमोशनल व्हायचं. मला चालते ती वाघिणीसारखी, असं हरणासारखं तिचं अगतिक होणं नाही आवडत मला. अन् ते पण कश्यासाठी.. हे भगवान... उठाले.. मी.. रेखा.. विनयभंग.. हाटट्... काहीही बोलते ही रागाच्या भरात..'

"तीला चांगलंच माहीत आहे मी नाही तसा तरीही आपलं काहीही.. ऊगीचच.. अर्रे रताळ्या... तीचं सोड.. तुला काय एवढं बाबू चव्हाणाच्या वस्तार्यासारखं हालायची गरज होती.. तू कशाला सत्यवादी हरीशचंद्र बनायचा प्रयत्न करतोस मला कळत नाही अजिबात... सांगायचं न काहीही.. काम जास्त होतं.. नायतर रवीबरोबर कामासाठी बाहेर गेलेलो.. काहीही.. सांगायचं की.. .. आयला ह्या रवीचं बराय राव.. एक्सट्रा मॅरेटियल अफेअर्स.. तेही दोनदोन.. अन् आम्ही.. आपल्या मनात काय नसून पण माझीच बायको तिच्या खयालांत मुलींना जबरदस्ती खेचून आणून माझा विनयभंग करवते..."

दुपार होईपर्यंत मोहनच्या मनात त्याच विचारांची चक्र फिरत होती. जेवणाची वेळ झाली तसा टिफीन घेऊन तो कॅन्टीनमध्ये निघाला. 'नको.., तिथं सतरा जणं आपला चेहरा ओळखुन थट्टा करतील.. त्यापेक्षा आज इथंच केबिनमध्ये बसतो..' मनात ठरवून मोहनने टिफीन उघडला. चपातीबरोबर आवडत्या मसुरच्या भाजीचा घास घेतला.. 'उमम्.. कायपन बोल तु बाकी, बायको

जेवण मस्त बनवते आपली.' खाताखाता तिसर्या डब्ब्याकडे लक्ष गेल् त्याचं. 'अरे, हा तिसरा डबा कसला..' उघडून पाहीला, 'उपमा..!' 'हात् त्याच्या.. सकाळी नाश्ता कुठं केलास तू घरी..' 'अशी आहे माझी साक्षी.., किती प्रेम करते माझ्यावर.. घरात सकाळी झालेल्या प्रसंगानंतर मी नाश्ता करायचा विसरलो पण तीने टिफीनसोबत नाश्ताही दिला.' 'मी मुर्खासारखा बाकीचं विसरून तोच विषय दिवसभर आठवत राहीलो अन् तीने एवढं घमासान करूनही आपलं काम चोख ठेवलं.'

'मी नेहमी ठरवतो की माझे दिवसभरातले मुलींसोबतचे प्रसंग साक्षीला नाही सांगायचे. पण मनात कोणतं ओझं ठेवून तिच्यासमोर जाणं नाही जमत मला. आणि ती.. होतं असे कधीकधी.. वैतागत असेल ती ही तेच तेच काम करून किंवा माझ्याशी दिवसभर बोलता येत नाही म्हणून.. किंवा तिच्यासाठी असलेला माझा वेळ मी इतर कोणाला देऊ नये म्हणून.. तसं ती बरीच पझेसिव्ह आहे माझ्याबाबतीत.. किंवा.....'

'एक मिनीट.... अरर् हा सिग्नल तर नाही ना.... ओह.. गॉड.. शिट...' आता मात्र मोहन आपल्या तंद्रीतून भानावर आला.

काय आहे ना, लग्नाआधी साक्षी आणि मोहन मध्ये काही नियम ठरले होते. साधे सोपे असे ते नियम कोणत्याही परिस्थितीत पाळायचेच असे स्पष्ट वचन होतं दोघांच. पहीला नियम, कॉलची समाप्ती 'लव्ह यू' याच शब्दाने होणार मग कॉलवर कितीही भांडणं होऊ दे. दुसरा नियम प्रत्यक्ष भेटीत जर भांडणं झालीच तर ज्याचा आवाज पहीला चढेल त्याने दूसर्याच्या गालावर किस करायचं.. मग काय.. या नियमांचा फायदा असा होता की कॉलवर यांच भांडण कधी दहा मिनिटाच्या वर टिकायचं नाही. आणि पब्लिक प्लेस मध्ये भांडण व्हायचंच नाही.

तर लग्नानंतर या नियमांत अजून एकाची भर पडली. तो तिसरा नियम असा, ' महीन्यातले ते काही मोजके चार-पाच दिवस भांडण पूर्णता टाळायचे (जरी झालेच तरी थोडफार व्हायला हवं ना राव), आणि इतर एखाद्या दिवशी जर वाद झाला तर त्या दिवसाची समाप्ती प्रणयाने करायची.'

मोहनला आठवू लागलं आतापर्यंत सर्व ठिकच होतं पण हल्ली ऑफिसमधला तणाव त्याच्यात येऊ लागला होता. तरीच साक्षी दोन-चार दिवसात सारखीच काही किरकिर करत असायची. नेमकं हेच त्याला उमगत नव्हते. असो आज झालेल्या खडाजंगीमुळे या प्रकरणाचा छडा लागला होता. संध्याकाळ होत आलेली. आज ऑफीसमधल्या कामाचा तर सत्यानाश झाला होता. पण चतूर कोल्हासारखं त्याने ज्यूनिअर्सवर काम टाकलं.

सहा वाजले आणि मोहन घरी जाण्यासाठी उठला. घरी पोहोचेपर्यंत त्याच्या मनात आनंदाच्या उकळया फुटत होत्या. आज बर्याच दिवसांनी त्याच्यात आणि साक्षीमध्ये वाद झाला होता.

घरी आल्यावर साधारण तासाभरात मोहन स्तब्ध उभा होता. आताही वर्षाव सुरू होता त्याच्यावर.. अहं.. ना पावसाच्या थेंबांचा ना शब्दांच्या टोचणार्या सुयांचा.. हा वर्षाव साक्षीच्या प्रेमाचा होता.

मोहनने पुन्हा तिच्या हवाली केलेलं स्वतःला. आणि हो.. या क्षणाला त्याला वेगळाच रोमांच मिळत होता..

# तो की ती

असे ऐकले आहे की या जगात प्रत्येक व्यक्तीसाठी कोणीतरी दूसरे जन्माला आले आहे.. तो दूसरा व्यक्ती जो त्याला शेवटपर्यंत साथ देईल. चला पाहू काही विशिष्ट परिस्थितीतदेखील जगातील काही वेगळ्या माणसांसाठी वरील नियम लागू होतो का?

नेहमीप्रमाणेच आजही तो लवकरच बेडवरून उठला. भरभर अंघोळ करून त्याच्या आवडत्या जागी गेला. ड्रेसींग टेबल, होय त्याची ही फेवरेट जागा होती.

समोरच्या आरशात स्वतःला न्याहाळत त्याने पाऊडर, फाऊंडेशन इत्यादी उरकले. निघताना होठांवर हलकीशी फीकट रंगाची लिपस्टिक पसरवली. आरशात पाहून स्वतःला स्मितहास्य देत पींक रंगाचा स्कार्फ डोक्यावर घेऊन पाहीले. लगेच तो स्कार्फ काढून पून्हा बॅगेत ठेऊन आणि बॅग पूढे छातिशी घेऊन तो निघाला ऑफिसमध्ये जायला. इतके सर्व करूनही आपले स्त्रीरूप जगासमोर येऊ नये याची थोडीफार काळजी त्याने घेतली होती.

'नयन' - दिसायला स्मार्ट, गोरापान.. बारीक सडपातळ शरीरयष्टी. चेहर्यावर समोर येणारे लांब मऊ केस... त्याची पर्सनालीटी एकदम चा ॅकलेट हिरोला साजिशी अशी होती. ऑफिसमध्ये म्हनुनच जेव्हा तो जा ॅईन झाला तेव्हापासून अनेक मुलींच्या नजरा त्याच्यावर होत्या. काहींनी प्रयत्न करूनही पाहीले पण जितके आकर्षण त्याच्या दिसन्यात होते, तितक्याच काही बाबी रहस्यमय वाटत होत्या.

नयन मात्र कोणाच्याही अध्यात मध्यात राहायचा नाही. बोलण्याबद्दल फक्त दोन चार मित्र. बाकी त्याचे आयुष्य फारसे स्वतःमध्येच होते. यामागे कारण तसेच होते. नयनचे मन, गूण जरी वरवर पुरूषी दिसत असले तरी त्याच्या आत एक स्त्री दडलेली होती. नटने, मूरडने, लाजने, आरशात स्वतःला सारखे न्याहाळत बसने या गोष्टींनी नयनचे अंग मोहरून यायचे. त्याला सजायला, नटायला खुप आवडायचे. साडी, ओढणी या गोष्टीबद्दल त्याला विलक्षण आवड होती. घरी कोणी नसताना तो आपली आवड बर्याचदा पूर्ण करून घ्यायचा. पण या बाबतीत त्याने

कोणालाही कधीही काहीही सांगितले नाही. समाज, आईवडील-बहीण, नातेवाईक काय सांगणार आणि कसे समजावे सर्वांना.

बरेच प्रश्न नयन समोर होते. शेवटी त्याने ठरवले कोणालाही काही सांगायचं नाही. आपण आपली आवड आपल्यापर्यंत ठेवून आपल्यामध्येच खुश राहायचे. म्हणूनच तो रोज हलकासा मेकअप् जो इतरांना सहजासहजी कळून येणार नाही अशाप्रकारे करून ऑफीसला जायचा. घरी कोणी नसले की साडी, ड्रेसेस घालून हौसेने कॅटवाॅक करायचा. जेवण बनवणे हा देखील त्याचा आवडता छंद. पण तोही त्याने घरात कधी समोर येऊ दिला न्हवता. अश्याच सर्व काही गोष्टी असूनही त्याने अजून पूढच्या आयुष्याचा विचार केला होता. स्वतः स्त्री मनाचा असल्यामुळे साहजिकच त्याच्यात भिती, दया, करुणा, लाज या गोष्टी जरा जास्तच सामावलेल्या होत्या.

त्यामुळे आयुष्य कसे जगायचे याबाबतीत त्याने पूर्ण खोलवर जाऊन विचार केला होता. यासर्वात एक गोष्ट मात्र नयनला माहीती होती की जरी त्याच्या आत एक स्त्री असली तरी तो एक पुरूष होता..

आणि त्यामूळे जेंडरचेंज वगैरे असल्या भानगडीत न पडता व कोणालाही आपल्यामुळे त्रास होऊ नये या बाबींचा नयनने विचार केला होता. तसेही सेक्स या विषयात त्याला तितकासा इंटरेस्ट नव्हता. मुलांसोबत रीलेशन त्याच्या विचारांत अजिबात नव्हते. आणि आकर्षण त्याला मूलींमध्येच होते. पण त्यात अजूनतरी त्याने लक्ष घातले नव्हते.

आपल्या जीवनात येणारे मग ते कोणीही असो त्याला आपल्याबाबत सर्व काही सांगायचं हे नयन ने ठरवले होते.

स्त्री मनाचा नयन मुलगी समोर आली की ईतर मुलांसारखा बावरून जायचा पण खर्या मनातल्या भावना तो कधीच समोर येऊन द्यायचा नाही, कारण मग सर्व कथा समोर मांडावी लागली असती. या विचारांनी नयन कोणा मुलीच्या मागे लागला नाही.

स्त्रीयांबद्दल त्याच्या मनात प्रचंड आदर होता. रोजच्या जीवनात आसपासच्या परिसरात स्त्रीयांना जरूर तेथे मदतीला धावणे, कोणाला अभ्यासाला मदत करणे, इथपासून ते शेअर ऑटोमध्ये एखादी मुलगी बाजूला येऊन बसली तरी नयन अंग चोरून बसायचा. समोरून कोणी आकर्षक मुलगी येत असेल तर कितीही पाहायची ईच्छा असूनही नयनची नजर खाली जायची. मुलींमध्ये पाहायचेच तर फारफार त्यांचे ड्रेस, मेकअप, सॅंडल यापलिकडे त्याची नजर जायची नाही.

टिव्ही, वर्तमानपत्रमधील बलात्कार, विनयभंग अश्या बातम्या नयनला विचलीत करायच्या. आणि कोणी इतके निष्ठूर कसे असू शकते इतके ती गोष्ट नयनला लागायची.

नयन हा असा आहे. कदाचीत तुमच्या आमच्यातलाच किंवा थोडा वेगळा. आज नेहमीप्रमाणेच ऑफिसला गेला. इथे का ॅलसेंटर मध्ये नयनला जा ॅईन होऊन चार महीने झाले होते. तसे नयन चोवीस वर्षांचा होत अन् सोबतचे सर्व वीस-बावीसचे. पण आपल्या देखणेपणा मुळे नयनचे वय कमीच वाटायचे.

नेहमीप्रमाणे नयन ऑफिसला आल्यावर आपल्या डेस्कवर जाऊन बसला. आपल्या कंप्युटरवर ला ॅगीन करून आलेले का ॅल्स अटेंड करू लागला. त्याच्या आवाजात नेहमीप्रमाणे सौम्यपणा होता. कस्टमर कितीही रागात असला तरी नयनच्या शांत आणि लाघवी स्वभावामूळे त्यांचा राग शांत व्हायचा. नयन आपल्या कामात मग्न होता पण कोपर्यातून एक नजर मात्र त्याच्यावर लक्ष ठेवून होती.

सीमा... नुकतीच आठ दिवसांपूर्वी जा ॅईन झाली होती. अजून तिचा ट्रेनिंग पीरियड संपला न्हवता. पण सिनीयर्सचे लाईव्ह रेका ॅर्डींग अनुभवन्यासाठी एक तास तिला भेटायचा. सीमा कोड्यात पडलेल्या नजरेने नयन कडे सुरूवातीपासूनच पाहायची. आजही तिची नजर नयनवरून हटत न्हवती. आज तसा सीमाने मनाशी निर्धार केला होता की काही झाले तरी आज काहीनाकाही करायचेच. कदाचित् सीमाला नयनबद्दल कळून आले असावे. म्हणूनच त्याच्याबद्दल विचारावेसे असे तिला वाटत असावे.

लंचब्रेक साठी दूपारी दोन वाजता नयन उठून कॅन्टीनमध्ये जाऊ लागला. त्याच्या मागावर असलेल्या सीमाने तो कॅन्टीनमध्ये पोहोचायच्या आतच त्याला गाठले.

त्याचा हात पकडून सीमा बोलली, "तूला काही विचारू का? हं म्हणजे पर्सनल आहे..."

खरंतर नयन अशा अचानक झालेल्या प्रश्नाने बावचळला होता. आपले काही हीला कळले तर नाही ना, किंवा आज आपला मेकअप जास्त तर झाला नाही ना असा विचार करत नयन चेहरा उगाचच पूसू लागला. किंचीतशी लाज मनात यायला लागली. आता काय करायचे. या मुलीने कोणाला सांगितले तर काय होइल असे एक ना शंभर प्रश्न नयनसमोर आले. आणि त्याहूनही मोठा प्रश्न हा होता ही आहे तरी कोण?...

इतके दिवस कधी ऑफिसमध्ये दिसली नाही. तसेही आपण कधी कोणालाही नीटसे पाहीले आहे.

नयन काहीच बोलत नाही हे पाहून सीमानेच सुरूवात केली..

"हाय.. मी सीमा.. अजून ट्रेनी आहे. आठ दिवसांपूर्वीच जाॅईन झालीय इथे. तूला पाहीले तिथपासून तू मला आवडायला लागला आहेस. तूझा होकार यावा अशी अपेक्षा आहे....."

धडाधड कानावर पडलेल्या या वाक्यांनी नयनला काय बोलू हे सूचत नव्हते.

पण वेळ मारून नेण्यासाठी नयन म्हणाला..

"आपण ऑफीस सुटल्यानंतर भेटू या का? "

सीमा ने होकार देताच नयन जेवायला निघून गेला. नयन ने पाहीले होते की त्यांच जे काही संभाषण चालू होते त्यावर एक दोन कोपर्यातून बारीक लक्ष आणि कान लागून होते.

संध्याकाळ होईपर्यंत सीमा बैचेन होत होती. त्याने लगेच का सांगितले नाही आपल्याला. संध्याकाळ पर्यंत वाट पाहायला का लावली. त्याला नक्की काय सांगायचं असेल, तो नकार तर नाही ना देणार. खुप काही असे सीमाच्या मनात चालले होते. एक मात्र नक्की की त्याची कोणी गर्लफ्रेंड नसावी नाहीतर मला कशाला भेटला असता संध्याकाळी. सीमा आपल्याच विचारात गुंतत होती.

सीमा दिसायला छान होती पण तिचा चेहरा फारसा गंभीर असायचा त्यामुळे मुलीच्या चेहर्यावर जे गोड स्मितहास्य असावे तसे तिच्या चेहर्यावर नसायचे. सीमाला विविध विषयांवर वाचायची खुप आवड होती. जीवनाच्या अनेक पैलूंवर तिने वाचन केले होते. आणि म्हणूनच ति कमी वयातच मॅच्यूअर्ड झाल्यासारखं वागायची. आपल्या ग्रुपमध्ये ती लिडरप्रमाणे पुढं असायची. स्ट्रेट-फाॅरवर्ड बोलणे, बोलताना समोरच्या व्यक्तीच्या डोळयात पाहणे. बिनधास्त राहून मनातले व्यक्त करणे. अश्या बर्याचशा बाबी सीमाच्या प्लस पाॅईंट मध्ये येत होत्या. तिचे राहणीमान, कपडे, हावभाव यांतून तिचा आत्मविश्वास झळकत असायचा. नयनला प्रपोज करताना तिला हाच स्वभाव कामी आला होता. आता सीमा ऑफिस सुटण्याची वाट पाहत होती. नयन काय बोलणार याविषयी तिला उत्सुकता होती.

इकडे नयन संध्याकाळी काय सांगायचं याची तयारी करून बसला होता. नाही म्हणायला त्यालाही सीमा आवडलेली. पण तिला जेव्हा आपल्याबद्दल कळेल तेव्हा ती कसे रीॲट करेल याचाच विचार नयन करत होता. तिच्यातला निर्भिडपणा त्याला विशेष भावला होता. सीमाला कसे सर्वकाही सांगायचं या विचारसत्रात नयन असताना ऑफिस सुटन्याची वेळ जवळ आली. आज वेळ जरा लौकरच गेला असे म्हणत नयन आवरायला लागला...

लाॅगआऊट करून नयन नेहमीप्रमाणे वाॅशरूमकडे गेला. पण आज रोजच्यासारखे रेंगाळत न बसता पटापट उरकून तो बाहेर आला. खाली मेन गेट वर पोहचण्यासाठी त्याला आणखी पाच मिनिटं गेली. गेटच्या बाहेर त्याची नजर गेली अन् डोक्यात प्रेशर आले. सीमा बाहेरच तिच्या ग्रुपसोबत नयनची वाट पाहत उभी होती. नयन थोडा जवळ येताच समोरून सीमा पुढे आली. सीमाकडे पाहून त्याने स्मितहास्य दिले. सीमाने त्याला "हाय" म्हटले. आपल्या ग्रुपचा निरोप नजरेनेच घेऊन सीमा नयनसोबत जाऊ लागली. शांत राहून दोघेही हळूहळू उगाचच कुठेतरी चालू लागले...

"कुठे जायचं..?" नयनने प्रश्न केला.

जो सीमाला अपेक्षित नव्हता. तिने एक क्षण त्याच्याकडे पाहीले अन् काहीतरी विचार करून बोलली..

"जिथे तू मनमोकळेपणाने माझ्याशी बोलू शकशील, तिथे जाऊया.."

प्रेमातल्या डावपेचामध्ये अगदीच अनुभवशून्य असलेल्या नयनने एखाद्या सिनेमातल्या सीनसारखे विचारले..

"काॅफी..?" ....

किंचित हसून मानेनच सीमाने होकार देला. संध्याकाळी सहा वाजता ते दोघे काॅफीशाॅप मध्ये पोहोचले.

नयनने खाली मानेनेच घड्याळ पाहीले.. आठ वाजायला पाच मिनीटं बाकी होती. थंड झालेला काॅफीचा तिसरा कप संपवून नयनने खाली ठेवला. त्याची नजर सीमाच्या नजरेस नजर देत नव्हती. सीमाही कुठेतरी शून्यात हरवली होती. मागच्या दोन तासात तिने जे काही ऐकले होते, त्याबद्दल कधी कल्पनाही तिने कधी केली नव्हती. टेबलवर शांतता पसरली होती. या प्रसंगाला कसे सामोरं जायचं हा विषयच कधी आपण ऐकला नाही.... सीमा विचार करत होती.

सीमा गप्प आहे हे पाहून नयनला कसेतरी वाटत होते. तिचे काहीच न बोलणे हा आपल्याला नकार आहे हे नयनच्या मनात आले होते.

थोडा वेळ गेल्यावर नयनच शेवटी बोलला.. "तुम्हाला भेटून छान वाटले, मी निघतो.."

"हं.., सीमा भानावर येऊन त्याला पाहू लागली अन् म्हणाली...

"आपण काही दिवस असेच भेटूया का..? नाही म्हणजे सुरूवातीला मी असा काही विचार केला नव्हता पण आता माझ्या मनात तूला जाणून घ्यायची इच्छा आहे."

नयनने होकार देतच म्हटलं "ठीक आहे पण आता निघायला हवं."

बाहेर आल्यावर एकमेकांना निरोप देऊन ते दोघे आपापल्या घरी निघून गेले. निघाल्यापासून सीमाच्या डोक्यात फक्त नयनच होता. हा असा कसा असू शकतो, कसाही वागू शकतो, मुलगा असूनही याच्या आवडीनिवडी मुलीसारख्या कश्या असू शकतात. या सर्व बाबींचे सीमाला आश्चर्य वाटत होते पण तितकेच कुतूहलदेखील होते. तसा त्याच्या वागण्याबोलण्यात एकप्रकारचा सभ्यपणा आहे आणि स्वतःचं मत व्यक्त करण्याआधी तो समोरच्याचं ऐकून घेतो.. इतरांना आदर देतो.. अरे.. हा तर मलाही 'तुम्ही' म्हणत होता. अन् मी त्याला अरेतूरे करत होती..

घरी येऊन रात्री जेवण उरकून सीमाने झोपायलाही घेतले पण अजून नयन काही तिच्या डोक्यातून जात नव्हता. इकडे नयनने मनाला पूर्ण समजावले होते की जे काही तिने ऐकलेय त्यावरून कोणीही मुलगी त्याच्या आयुष्यात येण्यास तयार होणार नाही. आज पहील्यांदाच आपण कोणापाशी व्यक्त झालो पण यातून जे काही निष्कर्ष समोर येत आहेत, ते पाहता यापुढे कोणाला काही सांगायलाच नको. तरीही तिला भेटायला भेटेल ही कल्पना सुखावह आहे.. माझ्याबद्दल जिला सर्वकाही माहीत आहे अशा व्यक्तीची सोबत थोडी का होईना पण भेटेल......

दूसर्या दिवसापासून सीमा आणि नयन रोज भेटू लागले. एक महीना गेला.. एव्हाना सीमा अन् नयन मध्ये छान दोस्ती झाली होती. त्याच्या स्वभावातले बरेचसे पैलू सीमापूढे आले होते. सर्वात महत्वाचं म्हणजे त्याच्यात मेलइगो जराही नव्हता. बाहेर फिरताना जाण्याच्या ठिकाणापासून

ते इतर सर्व गोष्टींमध्ये डिसीजन मेकर सीमा होती. कोणीतरी आपल्यावर हक्क गाजवण्याऐवजी स्वतःला आपल्या हवाली करत आहे आणि त्याबदल्यात आपल्याकडून काही अपेक्षाही ठेवत नाही. आणि आॅटोरिक्शात माझ्या बाजूला अंग चोरून बसलेला नयन कधी माझ्याशी प्रतारणा करू शकनार नाही.

सारंच कसे अकल्पित आणि छान सुरू आहे. "बस्स.. आता जेव्हा नयन समोर येईल तेव्हा त्याच्यापूढे आपले मन मोकळे करायचे, हो प्रथम मी फक्त रीलेशन बद्दल विचार केला होता पण आता लग्नासाठीच बोलायचे. थोडा वेगळा आहे तो पण हाच तो वेगळेपणा आहे जो माझ्या

होणार्या जोडीदारामध्ये असायला हवा. जर त्याच्या एवढ्याशा आनंदापुढे मला आयुष्यभर त्याच्याकडून हवा तो आदर हवी ती मोकळीक आणि माझे नंतरच्या आयुष्यातले स्वातंत्र्य मिळणार असेल तर हो मला ते मान्य आहे" सीमा मनातच बोलत होती.

नयनचे वागने, बोलने सीमाला भावले होते अन् तिच्या चावट विनोदांवर त्याचे लाजणे तर तिला वेगळाच आनंद देऊन गेले होते. जर अश्या माणसाच्या आयुष्यात फक्त काही क्षूल्लक गोष्टींमुळे कोणी आले नाही तर विनाकारण त्या माणसातील निर्विकार आणि खर्या भावना कधी कोणापुढं येऊ शकणार नाहीत. नाहीतरी कुठे असतात अशी माणसं जी कोणत्याही मुखवट्याविना समोर येतात.

त्यादिवशी नेहमीप्रमाणे तो तिला भेटायला आला. आज तो बराच शांत वाटत होता. समोर अथांग समुद्र होता. लाटा वेगाने पुढं येत होत्या पण त्या दोघांपासून थोड्या अंतर ठेवून मागे जात होत्या.

नयनने सीमाकडे पाहून विचारले,

"आपल्याला थांबवायला हवे हे, नाही का?" "असे किती दिवस आपण भेटायचे, बाकी काही नाही पण तुम्ही जेव्हा जाणार तेव्हा त्रास होइल मला.." "मी नाही म्हणालो तरी नकळत तुमच्यात गुंतत चाललो आहे." जमेल तसे आसू लपवत नयनने जे मनात आले ते सांगून टाकले.

सीमाने त्याच्याकडे एक कटाक्ष टाकला अन् हसू लागली... नयनला कळत नव्हते की हसतेय का.. शेवटी तीच हसत म्हणाली, "तू अगदी टिपीकल हीरोइनचा डायलॉग मारलास..."

नयन लाजून उभा राहीला अन् दूसरीकडे पाहू लागला. सीमा याच संधीची वाट पाहत होती.

"नयन..." सीमाचे शब्द कानावर पडताच त्याने मागे वळून पाहीले अन् आश्चर्याने तो सीमाकडे पाहत राहीला..

सीमा एक गुडघा खाली टेकवून हातात रींगची उघडलेली डबी त्याच्यापूढे करून बसली होती.. चेहर्यावर स्माईल आणत सीमा बोलू लागली..

"आठवड्यातून तीन दिवस तूझे असतील, चार माझे असतील.. आपल्याला घरात दोन वार्डरोब लागतील मी ते अरेंज करेन. ड्रेसींगटेबल शेअर करू.. तुझं प्रेम कधी कमी होणार नाही

ठाऊक आहे मला. मीही तुझे सर्व हट्ट पुरवेन. टीफीन मीच बनवत जाइन दोघांचा, नाश्ता मात्र तुझ्या हातचाच खाईन.. लग्न करशील माझ्याशी..."

डोळयात आलेल्या अश्रूंना न लपवता नयनचे दोन्ही हात स्वतःच्याच ओठांवर आले.. मनातल्या आनंदापुढं शब्दही जड होऊ लागले त्याने मानेनचं होकार दिला अन् खाली सीमाजवळ बसत तिचे हात हातात घेतले. सीमाच्याही डोळयात आनंदाश्रू होते.

"या जगात प्रत्येक व्यक्तीसाठी कोणीतरी जन्माला आले आहे जसे माझ्यासाठी तू..." "आपण आपलेच वेगळे विश्व बनवूया जिथे तू तूझ्या मनासारख राहू शकशील, तेव्हा तेवढ्या वेळेपूरता आपला जगाशी काही संबंध राहणार नाही"- सीमा.

तिच्या मनातलं ओळखून नयन म्हणाला, "हो, अन् आपल्याशिवाय ही गोष्ट कोणालाही कळणार नाही.."

पूढचे काही क्षण शांततेत गेले. समोरून एक मोठी लाट येऊन त्या दोघांच्या नकळत त्यांना भिजवून गेली. सीमाने आपली ओढणी नयनच्या पाठीवरून पसरवत पुढे घेतली.. नयन शहारला..

या अन् असल्या भावनांची किंमत आजवर फक्त नयन जाणून होता. आज तीचे मोल सीमालाही दिसले होते नयनच्या नयनांत...

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. निलेश देसाई यांचं हे तिसरं पुस्तक.**

निलेश देसाई एक सिद्धहस्त लेखक आहेत. वयाच्या अवघ्या तिशीपुर्वीच त्यांनी कादंबरीसारखा अवघड प्रकार हाताळला. त्यांच्या कथेमध्ये प्रेमाचे माधुर्य आणि व्यावहारिक जगाचे क्रौर्य या दोन्हींचे दर्शन असते. त्यांच्या काल्पनिक कथाही जमिनीलगतच्या असतात. ते आज ना उद्या एक मोठे लेखक म्हणून उदयाला येतील. पण लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. अशा तरूण लेखकांना बळ देण्यासाठी ई साहित्यचे लाखो वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांच्या विक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत.

ई
सा
हि
त्य
प्र
ति
ष्ठा
न

त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे, प्रीती सावंत दळवी, अजित पाटणकर असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.  आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?